। लातूर । वर्ष ३५ वे । अंक २१ वा । शुक्रवार, दिनांक ०३ एप्रिल २०२६ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.   RNI 47034/64

# लातूर समाचार

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)   कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियानातून विश्वासनिर्मिती व्हावी- मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

### पहिल्या टप्प्यात लाखो नागरिकांची प्रलंबित कामे निकाली

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील नागरिकांना महसूल सेवा सुलभ, वेगवान आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान राज्यभर प्रभावीपणे राबविले जावे. या अभियानांतर्गत आयोजित केल्या जाणाऱ्या शिबिरांमध्ये जनसामान्यांची महत्वपूर्ण कामे करण्यास प्राधान्य देण्याचे स्पष्ट निर्देश राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यस्तरीय समितीच्या आढावा बैठकीदरम्यान दिले.

मंत्रालयात झालेल्या या बैठकीस राज्यमंत्री योगेश कदम, अपर मुख्य सचिव विकास खारगे, संबंधित अधिकारी आणि आमदार उपस्थित होते. दि. ७ आणि १४ मार्च रोजी पार पडलेल्या या अभियानाचा पहिला टप्पा यशस्वी झाला असून, याद्वारे लाखो नागरिकांची प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकाली काढण्यात आली आहेत. महसूल विभागाशी संबंधित लोकांची केवळ किरकोळ स्वरूपाची नव्हे तर महत्वाच्या कामांचाही प्राधान्याने निपटारा होईल, यादृष्टीने शिबिरांचे नियोजन करण्याचे निर्देश मंत्री श्री. बावनकुळे यांनी यावेळी दिले.

छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियानांतर्गत राज्यभर शिबिरांचे नियोजन करण्यात आले आहे. त्याचा सविस्तर आढावा घेताना महसूल मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले की, या अभियानाच्या माध्यमातून लोकांमध्ये शासनाविषयी विश्वास निर्माण होण्यास मदत होत आहे. हे अभियान म्हणजे केवळ प्रशासकीय उपक्रम नसून नागरिकांच्या विश्वासाशी निगडित आहे. त्यामुळे संपूर्ण महसूल यंत्रणेने हे अभियान गांभीर्याने घ्यावे, शिबिरांचे नियोजन आणि सामान्य नागरिकांची कामे प्राधान्याने करावीत. शेतकऱ्यांपासून थेट शहरी नागरिकांपर्यंत महसूल सेवा अधिक तत्पर आणि वेगवान झाल्याची भावना नागरिकांमध्ये रुजावी, या दृष्टीने प्रत्येक शिबीर पार पाडले जावे, असे निर्देश त्यांनी दिले.



**डिजिटल सातबारा आणि इतर प्रमाणपत्रे**

**अभियानात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत १,९०,१६२ डिजिटल सातबारा, १,२२,७३९ आठअ उतारे आणि २,४६,४५३ प्रमाणपत्रे नागरिकांना वाटप करण्यात आली. यामुळे नागरिकांना संबंधित कार्यालयात जाऊन वेळ खर्ची घालावा लागला नाही. ऑनलाइनडिजिटल दस्तऐवज तत्काळ मिळू शकले. भूसंपादन प्रकरणे आणि अकृषक परवानगीच्या अनुक्रमे २,६९९ आणि १,०४७ प्रकरणांमध्ये कमीजास्त पत्रकांची तयारी करून गाव दप्तर अद्ययावत करण्यात आले असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.**

**लाखो नागरिकांना तत्काळ दिलासा**

गावपातळीवर आयोजित राजस्व शिबिरांमध्ये एक खिडकी व्यवस्थेअंतर्गत नागरिकांच्या ५७,१५२ अर्जांचा त्वरीत निपटारा करण्यात आला. यामध्ये ४४,७७६ फेरफार प्रकरणे निकाली करून जमिनीच्या मालकीच्या नोंदी अद्ययावत करण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर १७,४१४ सातबारा दुरुस्तीसाठी स्वीकारलेले अर्जदेखील त्वरीत निकाली काढण्यात आले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

**अभियानाच्या प्रगतीचा जिल्हानिहाय आढावा**

महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांनी अभियानाच्या प्रगतीचा जिल्हानिहाय आढावादेखील घेतला. शिबिरांमध्ये येणाऱ्या प्रत्येक अर्जावर ठराविक वेळेत निर्णय घ्यावा. तसेच नागरिकांना अनावश्यक त्रास होऊ नये, याची विशेष दक्षता घेण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. तसेच लोकांपर्यंत या शिबिरांची माहिती पोहोचावी यासाठी व्यापक जनजागृती करावी. शिबिरांमध्ये जमिनीच्या नोंदी, फेरफार, वारस नोंद आणि इतर प्रलंबित प्रकरणे तत्काळ निकाली काढण्यावर यंत्रणेने विशेष भर द्यावा, असे निर्देशही मंत्री श्री. बावनकुळे यांनी यावेळी दिले.

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेतून युवकांना स्वावलंबनाची संधी - उद्योगमंत्री उदय सामंत

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना (CMEGP) अंतर्गत आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये युवकांना उद्योजकतेकडे कळविण्यासाठी प्रोत्साहन देत मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती साध्य करण्यात उद्योग विभागाला उल्लेखनीय यश मिळाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असल्याची माहिती उद्योग मंत्री डॉ.उदय सामंत यांनी दिली.

उद्योग संचालनालयाच्या आकडेवारीनुसार, राज्यासाठी ३० हजार अर्जांचा लक्ष्यांक ठेवण्यात आला होता. त्यापैकी २५ हजार ५८७ अर्जांना बँकांकडून मंजुरी मिळाली असून ८५.२९ टक्के लक्ष्यपूर्ती साध्य झाली आहे. तसेच ६ हजार १९३ प्रकरणांमध्ये प्रत्यक्ष कर्ज वितरण होऊन २१ हजार ३५६.९८ लाख रुपयांचा निधी युवक उद्योजकांपर्यंत पोहोचला आहे. उर्वरित प्रकरणांची कर्ज वितरण प्रक्रिया सुरू असल्याचे मंत्री उद्योग डॉ.सामंत यांनी सांगितले.

उद्दिष्टपूर्तीत सांगली जिल्हा राज्यात अव्वल ठरला असून कोल्हापूर, हिंगोली, रत्नागिरी, धाराशिव, लातूर, अमरावती, गडचिरोली, जळगाव आणि वाशीम या जिल्ह्यांनी १०० टक्क्यांहून अधिक उद्दिष्टपूर्ती साध्य करत उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. ही योजना केवळ आर्थिक सहाय्य देणारी नसून युवकांना स्वावलंबी बनविण्याचे प्रभावी साधन ठरत आहे. यामुळे स्वतःचा उद्योग सुरू करण्यासाठी भांडवल उपलब्ध होत असून स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती वाढते, ग्रामीण व अर्धशहरी भागातील उद्योगांना चालना मिळते आणि कौशल्याधारित व्यवसायांना प्रोत्साहन मिळत आहे. परिणामी स्थलांतर कमी होऊन स्थानिक अर्थव्यवस्था बळकट होत असल्याचे दिसून येते.

गडचिरोली जिल्ह्यात शंभर टक्के उद्दिष्टपूर्ती नक्षलवादासाठी ओळखला जाणारा गडचिरोली जिल्हा आता 'देशातील स्टील हब' म्हणून उदयास येत आहे. मोठ्या उद्योगांसोबतच लघु व सूक्ष्म उद्योगांची वाढ होत असून स्थानिक युवक मोठ्या प्रमाणावर उद्योजकतेकडे वळत आहेत. CMEGP अंतर्गत जिल्ह्याने १०० टक्क्यांहून अधिक उद्दिष्टपूर्ती साध्य केल्याने या सकारात्मक बदलाला अधिक बळ मिळाले आहे.

## अशोक खरातला ७ दिवसांची पोलीस कोठडी

**नाशिक/प्रतिनिधी :** लैंगिक शोषण प्रकरणातील आरोपी भोंदू अशोक खरात याची गुरूवार (०२.) व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे नाशिक जिल्हा सत्र न्यायालयात सुनावणी पार पडली. आता न्यायालयाने त्याला ८ एप्रिलपर्यंत ७ दिवसांची पोलील कोठडी सुनावली आहे. एसआयटीने त्याला सुरक्षेच्या कारणाने व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर केले होते. तत्पूर्वी, एसआयटीने सुरक्षेच्या कारणास्तव न्यायालयाकडे व्हीसीद्वारे सुनावणीसाठी अर्ज केला होता. हा अर्ज न्यायालयाने मंजूर केला होता. यानंतर, व्हीसीद्वारेच त्याची सुनावणी पार पडली. त्याला आज पाचव्यांदा न्यायालयासमोर (व्ही सी च्या माध्यमाने) हजर करण्यात आले होते. खरेतर, खरातच्या दुसऱ्या एका गुन्ह्या संदर्भात ही सुनावणी होती. पहिल्या गुन्ह्यात त्याला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती.

**सुनावणी वेळी न्यायालयात तीन स्क्रीन**

सुनावणी दरम्यान, अशोक खरात प्रकरणातील तपास अधिकारी किरण कुमार सूर्यवंशी, तसेच सरकारी वकील ॲड. शैलेंद्र बागडे यांनी न्यायालयात युक्तिवाद केला. सरकारी वकिलांनी खरातची ७ दिवसांची पोलीस कोठडी मागितली होती. न्यायालयाने ती मंजुर केली. सुनावणीवेळी कोर्ट रूममध्ये तीन स्क्रीन लावण्यात आल्या होत्या. एका स्क्रीनमध्ये अशोक खरात होता. दुसऱ्या स्क्रीनमध्ये न्यायाधीश होते.

## बाष्पीभवन वाढले; रेणा-व्हटी प्रकल्पातील जलसाठ्यात घट

**रेणापूर/प्रतिनिधी :** रेणापूर तालुका हा नेहमीच टंचाईच्या छायेत राहिला आहे. सध्या तीव्र उन्हामुळे तापमानात वाढ होऊन विहिरी व बोअरचे पाणी कमी होत असून रेणा व व्हटी या प्रकल्पातील जलसाठ्यात मोठी घट होत आहे. रेणा नदी काढच्या शेतीला पाणी पुरवठा व्हावा म्हणून १२ मार्चला नदीवरील बॅरेजेसमध्ये १.५ दलघमी पाण्याचा विसर्ग करण्यात आला. याचा जवळपास अडीचशे हेक्टर क्षेत्रावरील उन्हाळी पिकांना फायदा होणार आहे. सध्या रेणा प्रकल्पात ५३. ४१ टक्के जलसाठा उपलब्ध आहे. अशी माहिती शाखा अभियंता श्रीनाथ कुलकर्णी यांनी दिली. कडक उन्हामुळे तालुक्याच्या भूजल पातळीमध्ये कमालीची घट होताना दिसत आहे. या वर्षी तालुक्यात अधिक पाऊस झाल्यामुळे रेणापूर तालुक्याची भूजल पातळी वाढण्यास मदत होईल अशी अपेक्षा होती. केवळ पिण्याच्या पाण्याचा व सिंचनाचा प्रश्न मार्गी लागला आहे. रेणापूर तालुक्यात गेल्या कांही वर्षातील पर्ज्यन्यमानाची स्थिती लक्षात घेता दरवर्षी तालुक्यातील जनतेला नेहमीच पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असे. मे २०२४ मध्ये भुजल विभागाच्या सर्वेक्षणाच्या अहवालानुसार रेणापूर तालुक्यातील १० गावे अतिशोषित म्हणून घोषित करण्यात आली होती. तीव्र उन्हामुळे तापमानाचा पारा ४० अंश सेल्सिअस पर्यंत गेला होता. तालुक्यातील लहान मोठे तलाव, बॅरेजेस, शेततळ्यातील पाण्याचा साठा कमी होत चालला आहे.

त्यामुळे पुढील काळात पिण्याच्या पाण्याचा व सिंचनाचा प्रश्न निर्माण होतो की काय अशी सध्याची स्थिती आहे. तीव्र उन्हामुळे तापमानाचा पारा ३२ अंश सेल्सिअस पर्यंत गेला होता.या वर्षी पावसाने तालुक्याची वार्षिक पर्जन्यमानाची सरासरी ओलांडली त्यामुळे रेणा मध्यम प्रकल्प, व्हटी प्रकल्प व लघु प्रकल्पातील जल साठ्यात अपेक्षित वाढ झाली होती. मात्र कडक उन्हामुळे पाणी पातळी झपाट्याने कमी होत आहे.

## दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी बोर्डाचा ऐतिहासिक निर्णय

### गुणपत्रक-प्रमाणपत्र आता एकाच कागदावर!

**लातूर (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांच्या हितासाठी एक अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. फेब्रुवारी/मार्च २०२६ च्या परीक्षेपासून विद्यार्थ्यांना आता गुणपत्रक आणि प्रमाणपत्र वेगवेगळे न मिळता, ते एकत्रित स्वरूपात देण्यात येणार आहे. लातूर विभागीय मंडळाचे सचिव यांनी यासंदर्भात लातूर, नांदेड आणि धाराशिव जिल्ह्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांच्या मुख्याध्यापकांना आणि प्राचार्यांना लेखी पत्राद्वारे निर्देश दिले आहेत.

आतापर्यंत गुणपत्रकावर नावाचा क्रम वेगळा असू शकत होता. मात्र, नवीन निर्णयानुसार एकत्रित गुणपत्रकावर विद्यार्थ्यांचे नाव 'प्रथम नाव, वडिलांचे नाव आणि आडनाव' अशा विशिष्ट क्रमानेच छापले जाणार आहे. या नावाच्या क्रमात काही त्रुटी असल्यास त्या ऑनलाइन पद्धतीने तत्काळ दुरुस्त करून घेण्याच्या सूचना मंडळाने दिल्या आहेत.

**फोटो दुरुस्तीसाठी शेवटची संधी**

ज्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रावर फोटो अस्पष्ट होते आणि त्यावर मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीने नवीन फोटो लावण्यात आले होते, अशा विद्यार्थ्यांची माहिती पुन्हा अपलोड करणे अनिवार्य आहे. यासाठी मंडळाच्या संकेतस्थळावर फोटो करेक्शन ही लिंक कार्यान्वित करण्यात आली आहे.

**मुख्याध्यापकांना कडक सूचना..!**

मंडळाने स्पष्ट केले आहे की, फोटो किंवा नावातील दुरुस्तीची ही शेवटची संधी आहे. यानंतर कोणत्याही प्रकारच्या दुरुस्त्या स्वीकारल्या जाणार नाहीत. जर एखाद्या विद्यार्थ्याची माहिती चुकीची छापली गेली किंवा फोटोमध्ये त्रुटी राहिली, तर होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस संबंधित शाळेचे मुख्याध्यापक किंवा महाविद्यालयाचे प्राचार्य वैयक्तिकरीत्या जबाबदार धरले जातील.

**महत्त्वाचे मुद्दे :**

एकत्रित दस्तऐवज : गुणपत्रक आणि प्रमाणपत्र आता एकाच कागदावर मिळणार.

नावाचा नवा फॉरमॅट : नाव, वडिलांचे नाव, आडनाव असा असेल क्रम.

अंतिम मुदत : फोटो दुरुस्तीसाठी पोर्टलवरील लिंकचा वापर तातडीने करणे आवश्यक.

**कागदपत्रांची संख्या कमी होणार..!**

या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची संख्या कमी होऊन ती जतन करणे सोपे होणार आहे. लातूर विभागातील तिन्ही जिल्ह्यांतील शिक्षणाधिकाऱ्यांनी आपापल्या स्तरावरून सर्व शाळा-महाविद्यालयांना या प्रक्रियेची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत.

रोज वाचा ऑनलाईन लातूर समाचार
www.latursamachar.com

### प्रभात किरणे

प्रत्येक गावा गावात
खरात आहे
श्रीमंत कुटुंबाची
दारातवरात आहे
धन नाही म्हणून
गरीब झुरत आहे
सत्य कळल्यावर
कोण आनंदात आहे
-इंजि. नागनाथ कलवले
लातूर
९१-९७६४७ ८८२८८

### उत्तर ..

प्रत्येक प्रश्नांसाठी
ठरले असते उत्तर
असे बसे चपखल
करु टाके निरूत्तर

कधी कधी प्रश्नास
देऊ पाहते दुरुत्तर
निर्माण होई पुन्हा
प्रश्न सत्राशे सत्तर

कधी रूबाब असा
प्रश्ना करे निरूत्तर
सडेतोड बोलेकसे
घडो काही बेहत्तर

आत्ता बंद हो तोंड
पाहू बाकीचे नंतर
धडाधडा बोलू बसे
न करे जमा खातर

देत राही प्रतिवादा
पुरावे ताथर मातर
उत्तर बनता आतूर
अस्वस्थ प्रश्न इतर

प्रश्नां मध्ये दम नसे
कधी कधी खरे तर
भिऊनि जाय प्रश्ना
उगाच करी थर थर

दक्षिणदिशेला वळे
उलटे फिरून उत्तर
होत्याचे नव्हते होई
बदलून जाय चित्तर

कधी अवचित घडे
दोघेही बनती मैतर
घट्ट नाते संबंध बने
मिटून टाकते अंतर

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

### कुजबुज

**-डॉ. संजय जमदाडे**



**चाळीस पेट्रोल केमिकल्स उत्पादनावरील संपूर्ण सीमा शुल्क माफ..**

### चिमटा दयाचा



**युद्धाची झळ जगाबरोबर भारतीयांना बसत आहे! स्वयंपाकाच्या गॅससाठी वन-वन फिरावे लागत आहे!! गॅसचे महत्त्व आता कळून आले आहे !!!**



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## नदी पुनरूज्जीवना बरोबर नदी जोड प्रकल्पाची गरज

ज्या राज्यात पाण्याची कमतरता नाही ते राज्य सुखी व संपन्न असते. बाराही महिणे पाणी राज्यात खेळले पाहिजे. सतत शेतीत उत्पन्न घ्यायचे झाले तर पाणी आवश्यक आहे. पाण्याशिवाय शेती नाही व शेती शिवाय राज्याचा विकास नाही. अशाने राज्यातील जनता सुखी व समाधानी राहाते. त्यासाठी राज्यातील जनतेनी विचार केला पाहिजे की, आपल्या राज्यातील नद्या आहेत त्याची खोलीकरण, रुंदीकरणाबरोबर दरवर्षी गाळ उपसला पाहिजे. वर्षभर पाणी मिळाले पाहिजे. पाणी असेल तर शेती आहे, शेतीत आनंद आहे हे लक्षात घेतले पाहिजे. आपल्या राज्यात बहुसंख्येने शेती करतात, शेती हा मुळ व्यवसाय आहे. बाकी जोडधंदे करीत असतील मात्र प्रत्येकांडे काही प्रमाणात शेती आहे. कमी अधिक प्रमाणात शेती आहे. त्यामुळे शेतीत उत्पन्न काढायाचे झाले तर पाणी आवश्यक आहे. चीन देश ज्यावेळी स्वतंत्र झाला त्यावेळी पहिले काम देशातील सर्व नद्या जोडल्या, देशभर पाणी फिरविले. त्यामुळे शेती उत्पन्नात आघाडी घेतली. शेती प्रगत पद्धतीने केली जाते. प्रत्येक वस्तूचा उपयोग केला जातो. कोणतीही बाबी फेकून दिली जात नाही. शेती हा त्यांचा मुळ व्यवसाय नाही तरी चीनने देशभर पाणी फिरविल्याने सर्वत्र पाणीच दिसून येते. पाण्यामुळे शेतीत आघाडी घेतली. पावसाचे पाणी एक थेंब ही वाया जावू दिले जात नाही. प्रत्येक थेंब जमीनीत मुरले जाते. आपल्याकडे सर्वाधिक पावुस पडून पाणी वाया जाते तेच पाणी साठविले तर निश्चित शेतीत उत्पन्न मोठ्या प्रमाणात वाढले जाईल. पंजाब, हरियाणा मध्ये मोठ्या प्रमाणात गव्हाचे उत्पन्न होते. तेथे यमुना, आदि नद्या आडविल्या आहेत. पाणी साठा आहे. अधिक उत्पन्न घेण्यासाठी प्रगत शेती केली जाते. प्रत्येकाकडे जनावरे आहेत त्याच प्रमाणे घरोघरी ट्रॅक्टर, माल वाहातुक टेम्पोची सोय आहे. दुध इतर राज्यात पाठविले जाते. पाण्याशिवाय काहीच शक्य नाही. तेंव्हा पावसाळ्यात जेवढा पाऊस पडतो तो पाऊस साठविला पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत पाणी वाया जावू न देणे हे महत्वाचे आहे. त्यासाठी नद्याचे पुर्नजीवन करावे, त्याबरोबर नद्या जोड कार्यक्रम हाती घ्यावा लागेल. याला मोठा खर्च आहे. मोठ्या निधीची गरज आहे. असे जरी असले तरी प्रत्यक्षात राज्यात सुखाचे दिवस आणण्यासाठी नदीवर बंधारे, नवीन मार्ग काढावे लागतील. ज्यामुळे पाणी वाया जाणार नाही. आता कोठे सरकारचे या बाबीकडे लक्ष वेधले आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यासाठी चांगला व लाभदायक निर्णय घेतला आहे. आता राज्यातील नद्यांचे प्रदूषण कमी करण्यासाठी आणि नदी संवर्धन-पुनरुज्जीवन करण्यासाठी नियामक आणि विकासात्मक अशी दोन्ही कामे करण्यासाठी महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण स्थापन करण्यास बुधवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. या प्राधिकरणाचे अध्यक्ष मुख्यमंत्री असतील, तर उपाध्यक्ष पर्यावरण मंत्री असतील. वित्त मंत्री, नगरविकास मंत्री, जलसंपदा मंत्री, उद्योग मंत्री, ग्रामविकास व पंचायतीराज मंत्री सदस्य असतील. पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे सचिव हे सदस्य-सचिव असतील. देशभरातील २९६ प्रदूषित नदी-पट्टे असून, त्यापैकी सर्वाधिक ५४ प्रदूषित काळू, मुळा, मुळा-मुठा, मुठा, भीमा, पवना, नाग, चंद्रभागा, पंचगंगा यांचा समावेश आहे. औद्योगिक सांडपाण्यासंबंधात उपाययोजना, अतिक्रमणे रोखण्यासाठी नदीकाठचे क्षेत्र निश्चित करण्यासाठी प्राधिकरण शिफारस करेल. ज्यावेळी देशाचे पंतप्रधान म्हणून अटलबिहारी बाजपायी होते त्यांनी सुरेश प्रभु यांच्यामार्गदर्शनाखाली नदीजोड प्रकल्प हाती घेतला होता. तो पुर्ण होवू शकला नाही. पुर्ण देशभर हा एकाचवेळी कार्यक्रम राबविण्यापेक्षा टप्पा-टप्प्याने कार्यक्रम हाती घेणे योग्य आहे. एकाच वेळी निधी खर्च करणे अशक्य दिसून येते. त्याच प्रमाणे उदा. घ्यायचे झाले तर राज्यातील ठराविक जिल्ह्यात नद्या आहेत. त्याच जिल्ह्यात पहिल्यांदा कार्यक्रम राबविला पाहिजे. निम्मे राज्य पाण्याखाली येवू शकते. ही बाब लक्षात घेतली तर बाराही महिणे नद्या असणाऱ्या भागात पाणी कमी पडणार नाही. नद्यापासून कॅनलची निर्मिती केली पाहिजे. आता पुर्वीसारखे अनेक महिणे काम करण्याची गरज नाही. जेसीबी, पोकलेंन, मोठ्या क्षमतेचे जेसीबीद्वारे काम करता येते. आठ दिवसात कॅनलीची निर्मिती होते. त्याच बरोबर नवीन नदीचे पात्र निर्माण करता येवू शकते. नदी निर्माण करू शकतोत असे प्रकल्प हाती घेण्याची गरज आहे. नद्यातर सतत स्वच्छ कराव्यात लागतील. नदीत गाळ मोठ्या प्रमाणात जमा होतो. तो उपसला पाहिजे. त्याचे शुद्धीकरणही आवश्यक आहे. अशा प्रकल्पामुळे राज्यातील शेतकरी सुखी व आर्थिकदृष्टया संपन्न होईल. शेतकरी हा आर्थिक आडचणीत येतो कारण शेतीत उत्पादन होत नाही. शेतीत उत्पादन होण्यासाठी पाणी आवश्यक आहे त्यासाठी पाण्याचे स्त्रोत निर्माण करावे लागते. पाण्याची उपलब्धी आवश्यक आहे. अनेकांच्या विहिरी व विंधनविहीरीला उन्हाळ्यात पाणी दिसून येत नाही. मुळात जमीनीत पाणी मुरण्याची यंत्रणा व क्षमता निर्माण केली जात नाही, त्याकडे लक्षही दिले जात नाही. नदी, कॅनलमध्ये पाण्याचा साठा राहिल्यास पाणी झिरपले जाते त्यामुळे जमीनीत ओलावा निर्माण होवून उन्हाळ्यात पाणी मिळते. डोंगर, उंच भागावरील पाणी पायथ्याशी येवून वाहून जाते. ते पहिल्यांदा वाचविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. काही झाले तरी पाण्याची साठवणुक व बचतीची मोठी गरज आहे. त्यात राज्याने नद्यांचे प्रदूषण कमी करण्यासाठी आणि नदी संवर्धन-पुनरुज्जीवन मोठी गरज आहे. ही बाब दुर्लक्षित झाली होती. महत्वाचा व दुर्लक्षित विचाराला चालना दिली जाणार असल्याने निश्चित याचा लाभ होणार आहे. महत्वाची बाब आहे. महत्वाचे काम आहे. त्यामुळे याला गती देण्याची गरज आहे. प्रत्यक्षात कामास गती देवून काम सुरू होणे अपेक्षित आहे. अनेक नद्याचे संवर्धन व पुर्नजीवन ही काळाची गरज होती ती ओळखली गेल्याचे समाधान आहे. सध्याच्या परिस्थितीत या बाबीची गरज होती ती राज्य शासन पुर्ण करीत असल्याचे मोठे समाधान वाटत आहे.

## आठवणींच्या ओलाव्यातून उंबरठा ओलांडताना!

# दयानंद वाणिज्य महाविद्यालयात बी.कॉम. तृतीयच्या विद्यार्थ्यांकरिता निरोप समारंभ




**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद वाणिज्य महाविद्यालयात बीकॉम तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी १ एप्रिल २०२६ रोजी भावनिक वातावरणात निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. तीन वर्षांच्या आठवणींनी ओथंबलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयीन प्रवासातील अनुभव सांगताना अनेक क्षण डोळ्यांत पाणी आणणारे ठरले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर होते. यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनीषा आष्टेकर आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून महाविद्यालयातील शिक्षण, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि मैत्रीचे क्षण यांची उजळणी केली. काही विद्यार्थ्यांनी आपल्या यशामागील महाविद्यालयाच्या भूमिकेचा उल्लेख करत कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी डॉ. गणेश लहाने, डॉ. बाळासाहेब चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.प्रशांत मान्नीकर म्हणाले, या महाविद्यालयाने केवळ गुणवंत विद्यार्थी घडविले नाहीत, तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वात चांगले संस्कारही रुजविले आहेत. हेच आमच्या संस्थेचे खरे वैशिष्ट्य आहे. त्यांच्या या शब्दांनी उपस्थित विद्यार्थ्यांच्या मनात नव्या वाटचालीसाठी प्रेरणा निर्माण झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अक्षय पवार यांनी केले, तर शेवटी डॉ. विशाल वर्मा यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

I d DCCL

तीन वर्षांचा प्रवास हास्य, अश्रू, मैत्री आणि स्वप्नांनी सजलेला आज निरोपाच्या उंबरठ्यावर उभे राहून, प्रत्येक क्षण मनात खोलवर कोरला गेला DCCL हे फक्त महाविद्यालय नाही,

तर आयुष्य घडवणारे एक सुंदर विश्र्व आहेइथे मिळालेले ज्ञान, संस्कार आणि मैत्री... आयुष्यभर सोबत राहतीलविद्यार्थ्यांनी दिलेली I Love Dayanand College of Commerce ही फ्रेम केवळ एक भेट नव्हे, तर त्यांच्या मनातील प्रेम आणि कृतज्ञतेची जिवंत आठवण आहे आठवणी राहतील नाती टिकतील आणि DCCL सदैव हृदयात जिवंत राहील!

## राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातर्फे केंद्रे दाम्पत्याचा सत्कार




**लातूर/प्रतिनिधी :** शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत 'नवराष्ट्र'तर्फे एज्युकॉन पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल राजमाता जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, तुळजाभवानी विद्यालय व राजमाता जिजामाता एम.सी.व्ही.सी. शाखेच्यावतीने राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे व अध्यक्षा के. ए. जायेभाये यांचा गुरुवारी सत्कार करण्यात आला.

यावेळी राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, समन्वयक अशविनी केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक वैशाली केंद्रे, राजीव मुंढे, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजेंद्र जायेभाये, प्रा. राजकुमार जाधव, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते यांची प्रमुख उपस्थिती होती. राजीव मुंढे यांनी स्वागत गीत गायीले. सूत्रसंचालन मदन धुमाळ यांनी केले तर आभार प्रा. बी. बी. खटके यांनी मानले.

सत्काराला उत्तर देताना प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले, राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाने गुणवत्तेत गरूडझेप घेतली असून संकुलातर्फे गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासोबतच विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. या संकुलाने अनेक जिल्हाधिकारी, शिक्षक, डॉक्टर, इंजिनिअर घडविले आहेत. या संकुलात २५०० विद्यार्थी शिकत असून १२१ कर्मचारी कार्यरत आहेत. आगामी शैक्षणिक वर्षात १२१ मुली दत्तक घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. स्मार्ट बोर्ड, इन्ट्रॅक्ट बोर्ड, डिजिटल क्लासरूम, स्मार्ट क्लासरूमच्या माध्यमातून कौशल्य विकासावर आधारित अभ्यासक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देण्यात येणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. तसेच ११वी कला शाखेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एमएससीआयटीचे शिक्षण देण्यात येणार असल्याची घोषणाही प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी केली.

# गतिमान प्रशासनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग : राज्यात 'साधना सप्ताह'




लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये सर्व सामान्य जनतेला शासनाच्या विविध योजना व कार्यक्रमांद्वारे सोयी, सुविधा, लाभ आदी पोचविण्यासाठी शासन सक्षमपणे कार्य करते. आणि या व्यवस्थेची भिस्त असणारी प्रशासन व्यवस्था त्यामुळेच सक्षम असावी लागते. प्रशासनात कार्य करणाऱ्या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करता यावा यासाठी विविध प्रशिक्षणांद्वारे क्षमता विकास करण्यात येते. याचाच एक भाग म्हणून केंद्र शासनाने क्षमता विकास आयोग (सीबीसी) आणि- कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने २ ते ८ एप्रिल २०२६ या कालावधीत 'साधना सप्ताह' आयोजित केला आहे. महाराष्ट्रातही मंत्रालयीन व राज्यभरातील विविध शासकीय कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी 'साधना सप्ताह' अंतर्गत ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाचा सर्व क्षेत्रात होत असलेला वापर पाहता राज्य शासनाचाही तंत्रज्ञानाधारित कार्यक्रमात पुढाकार राहिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्याच्या गतिमान प्रशासनाची घोडदौड सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राज्यात १०० दिवसांचा प्रशासकीय सुधारणा कार्यक्रम आणि १५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. या पाठोपाठ आता केंद्रशासनाचा 'साधना सप्ताह' राज्यात राबविण्यात येणार आहे. राज्य शासनाच्या मंत्रालयीन सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी तसेच विभागीय आयुक्त कार्यालये आणि विभागांतर्गत येणारे जिल्हाधिकारी कार्यालये, जिल्हा परिषद आदींमध्ये अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी या सप्ताह अंतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा यासह प्रशासनातील विविध विभागामध्ये सक्षमपणे कार्य करण्यासाठी तंत्रज्ञानाच्या उपयोगाधारित प्रशिक्षण देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे या मोहिमेअंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विभाग आणि कार्यालय प्रमुखांना मे २०२६ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या 'ढएउक- वारी २.०' या कार्यक्रमावेळी प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

'कर्मयोगी भारत' हा केंद्र शासनाचा एक डिजिटल प्लॅटफॉर्म व अभिनव राष्ट्रीय उपक्रम आहे. तंत्रज्ञानआधारित शिक्षणाद्वारे शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता,कौशल्य आणि शासनक्षमता वाढविण्यासाठी या प्लॅटफॉर्मवर विविध प्रशिक्षण कार्यक्रम उपलब्ध करून देण्यात आले आहेत. केंद्र शासनाने 'साधना सप्ताह' अंतर्गत शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी कर्मयोगी प्लॅटफॉर्म वरील तंत्रज्ञानाधारित ५० प्रशिक्षण कार्यक्रमांची यादी तयार केली आहे. या सप्ताह अंतर्गत प्रत्येक अधिकारी-कर्मचाऱ्यांनी यादीतील एकूण प्रशिक्षण कार्यक्रमांपैकी किमान चार तासांचे प्रशिक्षण करणे अनिवार्य आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये 'लोकप्रशासनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता', 'आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या मूळ बाबी : शिकणे, उपयोग आणि नैतिकता', 'प्रशासनासाठी जबाबदार एआयचा उपयोग', 'सर्वांसाठी युवा ए आय' असे एकूण ४४ मिनिटे ते ४६ तास काल मर्यादेचे एकूण ५० प्रशिक्षण कार्यक्रम कर्मयोगी प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

महासंचालकांच्या पुढाकाराने माहिती व जनसंपर्क विभागातही 'साधना सप्ताह'

केंद्र शासनाच्या सूचनानुसार प्रशासकीय क्षमता सुधारण्यासाठी राबविण्यात येत असलेला 'साधना सप्ताह' हा माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांच्या मार्गदर्शनात व नेतृत्वात या विभागात राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्हा माहिती कार्यालये, मुंबई येथील या विभागाचे मुख्यालय तसेच महाराष्ट्र परिचय केंद्र नवी दिल्ली आणि पणजी येथील कार्यालयांमधील १००२ अधिकारी-कर्मचारी 'साधना सप्ताह' अंतर्गत विविध प्रशिक्षण पूर्ण करणार आहेत. महासंचालक ब्रिजेस सिंह यांनी या संदर्भात बैठक घेऊन विभागाला सूचना दिल्या आहेत.

## १५० दिवसांचा ई गव्हर्नन्स उपक्रम; शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या कामगिरीची दखल

राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई गव्हर्नन्स उपक्रमात शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाने सार्वजनिक उपक्रम कंपनी संवर्गात प्रथम क्रमांक पटकावला. यानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबई येथे महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड यांचा सन्मान करण्यात आला. यानिमित्त हा लेखष्ठ

राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागाचा एक भाग असलेल्या शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ यांच्या माध्यमातून आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकास आणि त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी विविध कर्ज योजना राबविण्यात येतात. याबरोबरच आदिवासी बांधवांनी उत्पादित मालाला 'शबरी नॅचरल्स' या ब्रॅण्डच्या माध्यमातून बाजारपेठ मिळवून देण्यात येत आहे. महामंडळातर्फे तंत्रज्ञानाचा कल्पकतेने वापर केला जात आहे. त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. प्रशासकीय कामात पारदर्शकता, वेग आणि सुलभता आणण्याच्या उद्देशाने सेवाकर्मी हा कृती आराखडा राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत आहे. या आराखड्याचा मुख्य केंद्रबिंदू हा सरकारी सेवा जनतेच्या दारापर्यंत पोहोचवणे आणि अंतर्गत कामकाज पूर्णपणे डिजिटल करणे हा आहे.

या सुधारणांचा एक भाग म्हणून 'सेवाकर्मी प्लस' ही १५० दिवसांची विशेष मोहीम होय. या मोहिमेत शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाने 'सार्वजनिक उपक्रम' (कंपनी) या संवर्गात राज्यात प्रथम क्रमांक पटकावला. महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती बनसोड यांच्या मार्गदर्शनाखाली महाव्यवस्थापक जयरेखा निकुंभ, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी काम केले. यामध्ये कार्यालयाचा आकृतीबंध सुधारित केला असून त्यास १० पैकी १० गुण प्राप्त झाले आहेत. कार्यालयातील सर्व संवर्गाचे सेवाप्रवेश नियम तयार करून ते अद्ययावत करण्याची १०० टक्के कार्यवाही पूर्ण केली आहे. कर्मचाऱ्यांच्या हक्कांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या जेष्ठता सूचीबाबतही महामंडळाची कामगिरी उत्तम असून, सन २०२४-२५ या वर्षासाठी सर्व संवर्गाच्या सूची अद्ययावत करून प्रसिद्ध केल्या आहेत. बिंदू नामावली प्रमाणीकरणाच्या बाबतीत, ३१ ऑगस्ट २०२३ अखेर मंजूर ७२ पदांच्या आकृतीबंधानुसार सर्व संवर्गाच्या बिंदू नामावली प्रमाणित करून घेण्याचे काम ८१ ते १०० टक्के मर्यादेत पूर्ण झाले आहे. अनुकंपा तत्त्वावरील नियुक्त्यांसाठी उपलब्ध असलेल्या पदांपैकी ८१ ते १०० टक्के पदांवर नियुक्त्या देण्याची प्रक्रिया राबविली. तंत्रज्ञान आणि प्रशिक्षणात महामंडळाने केंद्र शासनाच्या 'ग्उध्ऊ' पोर्टलचा वापर सुरू केला आहे. कार्यालयातील ९० टक्के कर्मचाऱ्यांनी या पोर्टलवर नोंदणी केली असून, तेवढ्याच प्रमाणात कर्मचाऱ्यांनी किमान ५ ऑनलाईन अभ्यासक्रम पूर्ण केले आहेत. ९५ टक्के कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके अद्ययावत करून डिजिटल केली आहेत. त्यासाठी महामंडळाला २० पैकी २० गुण मिळाले आहेत.

महामंडळाची ारहरींवल.ळप आणि ारहरीहरलरीळ.ळप ही दोन्ही संकेतस्थळे वापरकर्त्यांना सुलभ केली आहेत. तेथे प्रकल्प, कर्ज योजना आणि निविदांची अद्ययावत माहिती उपलब्ध आहे. ही संकेतस्थळे एएथ सिक्युरिटी आणि Cloudflare द्वारे सुरक्षित केली आहेत. या पोर्टलवर आता विषणात्मक आकडेवारीचा डॅशबोर्ड देखील उपलब्ध आहे.

नागरिकांना मिळणाऱ्या सेवांसाठी 'आपले सरकार' पोर्टलशी एकत्रीकरण केले आहे. आता अर्जदाराला कर्ज योजनेचा लाभ घेण्यासाठी श्रेरप.ारहरीहरलरीळ.ळप या पोर्टलवरून घरबसल्या ऑनलाइन अर्ज करता येतो. शेतकरी उत्पादक संस्थांसाठी स्वतंत्र पोर्टल विकसित केले आहे. प्रस्तावांची मंजुरी आणि संनियंत्रण ऑनलाइन केले जाते.

आदिवासी बांधवांनी तयार केलेल्या प्रीमियम उत्पादनांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी ८ एप्रिल २०२५ रोजी 'शबरी नॅचरल्स' या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मचे अनावरण करण्यात आले. महामंडळाचे अंतर्गत कामकाजासाठी 'ई-ऑफिस' (e-Office) प्रणालीचा १०० टक्के वापर सुरू केला आहे. आतापर्यंत ८७ टक्क्यांपेक्षा जास्त फाईलचा निपटारा या प्रणालीच्या माध्यमातून करण्यात आला आहे. कर्मचाऱ्यांची उपस्थिती, रजेचे व्यवस्थापनही आधार बेस अएइअड या डिजिटल प्रणालीद्वारे जतन केले जात आहे.

व्हॉट्सअॅप चॅटबॉटच्या (WhatsApp Chatbot) माध्यमातून तक्रार निवारण आणि अर्ज ट्रॅकिंगची सुविधा सुरू करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. लाभ वितरणाचे अभिलेख पारदर्शक ठेवण्यासाठी 'ब्लॉकचेन' आणि लाभार्थ्यांची पात्रता तपासणीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर प्रस्तावित आहे. भौगोलिक माहिती प्रणाली आणि रिमोट सेन्सिंगचा वापर करून लाभार्थ्यांचे मॅपिंग करण्याचे कामही प्रगतीपथावर आहे. एकूणच सेवाकर्मी पुरस्काराचे माध्यमातून आदिवासी बांधवांचे जीवनमान उंचावण्यासाठी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळातर्फे होत असलेल्या कामाला मोहोर प्राप्त झाली आहे.

---------------------

## तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि नागरिकांना दर्जेदार सेवा; नाशिक जिल्हा परिषद राज्यात पाचव्या क्रमांकावर

**१५० दिवसांचा ई गव्हर्नन्स उपक्रम**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात नाशिक जिल्हा परिषदेने उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. यानिमित्त राज्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते मुंबई येथे नाशिक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. यानिमित्त हा लेखष्ठ

राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम ांतर्गत जिल्हा परिषदांच्या कामगिरीचे मूल्यांकन करण्यात आले होते. या कार्यक्रमात कार्यालयाची अधिकृत वेबसाइट, 'आपले सरकार' प्रणाली, ई-ऑफीस, कार्यालयीन डॅशबोर्ड, व्हॉट्सअॅप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) व ब्लॉकचेनचा शासकीय कामकाजात वापर तसेच भौगोलिक माहिती प्रणालीचा (ऋखड) प्रभावी वापर अशा सात महत्त्वाच्या घटकांचा समावेश होता. या सर्व निकषांवर उत्कृष्ट कामगिरी करत नाशिक जिल्हा परिषदेने एकूण १६५.७५ गुण मिळवून राज्यात पाचवा क्रमांक मिळवला होता.

नाशिक जिल्हा परिषदेने आपल्या २० सेवा व्हॉटस?पच्या (जनसेतू) माध्यमातून उपलब्ध करून दिल्या आहेत. अतिशय सुलभ आणि सोप्या पद्धतीने या सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या एकूण आरटीएस सेवांपैकी ९५ टक्क्यांपेक्षा अधिक सेवा या व्हॉटसअॅपवर उपलब्ध करून दिल्या आहेत. चॅटबॉट अॅण्ड्राइड, आयओएस आणि वेब यासारख्या व्यासपीठांवर नागरिकांच्या प्रश्नांना सातत्याने प्रतिसाद दिला जात आहे. विशेष म्हणजे या सेवा मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषेत उपलब्ध आहेत.

आदिवासी बांधवांच्या हक्कासाठी पेसा अॅप कार्यान्वित करण्यात आले आहे. त्यात पेसा ग्रामपंचायतीच्या ५ टक्के अबंध निधी योजना व्यवस्थापन प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. यामुळे कामाची पारदर्शकता, गुणवत्ता व कार्यक्षमतेत वाढ होण्यास मदत झाली आहे.

'हर घर नल से जल' हेच शासनाचे ध्येय आहे. त्यानुसार जलजीवन मिशन वर्क्स क्वालिटी मॉनिटरिंग सिस्टिम अॅपअंतर्गत जीपीएस आणि जीआयएस आधारित मोबाईल अॅप कार्यान्वित करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील १५ तालुक्यांमधील कामांचे मोबाईलवरून थेट सनियंत्रण करणे शक्य झाले आहे. ग्रामस्थांसाठी ऑनलाइन तक्रार नोंदणीची सुविधा आहे. या तक्रारींवर तातडीने कार्यवाही जिल्हा परिषदेच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांसाठी ई-पशु या अॅपच्या माध्यमातून विविध पशुवैद्यकीय सेवा व माहिती ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यात आजारांची नोंद, लक्षणे व उपचाराबाबत मार्गदर्शन, लसीकरण व उपचाराची डिजिटल नोंद, सेवा आणि भेटीसाठीचे सुलभ वेळापत्रक, जीपीएस आधारित पशुवैद्यसेवा शोध आदींचा समावेश आहे. या अॅपच्या माध्यमातून कृत्रिम रेतन १५ हजार ८४२, गर्भधारणा तपासणी २३ हजार ९२३, वंध्यत्व उपचार १३ हजार २३४, शस्त्रक्रिया १ हजार ९३२, बंध्याकरण ९ हजार करण्यात आले, तर १० लाख ९६ हजारांच्यावर लस जनावरांना देण्यात आल्या आहेत. तसेच ५० हजारांपेक्षा जास्त जनावरांवर औषधोपचार करण्यात आले आहेत.

# मुक्त लेखकांवरही निर्बंध?

मुक्त लेखकांच्या मतांवर तक्रार संघ परिवाराकडून केली जाणार, त्याची दखल समिती घेणार आणि मजकूर काढून टाकण्याचा 'आदेश' दिला जाणार अशी 'व्यवस्था' निर्माण होण्याची भीती वाढली आहे.

समाज माध्यमांवर बातम्या अथवा मत व्यक्त करणार्या लेखकांना कायद्याच्या 'चौकटीत' आणण्याचे केंद्र सरकारने ठरवले आहे. 'यू ट्युब', 'इन्स्टाग्राम' किंवा 'एक्स'(पूर्वीचे 'ट्वीटर') अशा व्यासपीठांवर लेखन करणारे पत्रकार/लेखक यांचा त्यात समावेश असेल. २०२१ च्या माहिती तंत्रज्ञान नियमांत अनेक 'सुधारणा' सुचवणारा मसुदा नुकताच सादर झाला आहे. आंतर विभागीय समितीकडे काही तक्रार/गार्हाणे आल्यास त्या आधारे संबंधित मजकूर (कंटेंट) अडवण्याचा (ब्लॉक) आदेश देण्याचा अधिकार माहिती व नभोवाणी खात्यास मिळू शकेल, असे या सुधारणेत म्हटले आहे. लेखकांनी माफी मागावी किंवा मजकुरात बदल करावेत असे आदेशही खाते देऊ शकेल. मध्यस्थ, म्हणजे समाज माध्यमे व डिजिटल माध्यमे यांच्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे व नीतिमत्ता नियम (एथिक्स कोड) २०२१ च्या माहिती



मजकुरावर निर्बंध लादण्याचे मोदी सरकारचे प्रयत्न सुरूच आहेत. एखाद्या लेखकाबद्दल समाज माध्यम कंपनीकडे माहिती मागण्याचा आणि थेट त्या लेखकास मजकूर अडवण्यास सांगण्याचे अधिकार सरकारला देण्याची ही 'दुरुस्ती' आहे. ज्या व्यक्ती समाज माध्यमांवर नियमितपणे लिहीत नाहीत, त्यांनी कधीतरी एखाद्या ताज्या घडामोडीवर भाष्य केले, किंवा 'स्टँड अप कॉमेडिअयन' या वर्गात येण्यार्या व्यक्तीने सरकारी धोरणावर विनोद केला व तो ऑन लाईन प्रसिद्ध केला तर त्या व्यक्तीलाही असा 'आदेश' दिला जाऊ शकतो. लेखकाला किंवा कोणत्याही प्रकारे मजकूर (कंटेंट) तयार करणार्या व्यक्तीस थेट बंदीचा आदेश देण्याची पद्धत लोकशाही असलेल्या देशांत कोठेही नाही. समाज माध्यमांना तो मजकूर काढून टाकण्याची विनंती केली जाते. वापरकर्त्यांचा मजकूर प्रसिद्ध करण्यास दिलेल्या


तंत्रज्ञान नियमात समाविष्ट आहेत. त्या नियमांचा तिसरा भाग व्यावसायिक माध्यम संस्थांसाठी आहे. आता, ज्याची व्याख्या 'प्रकाशक' अशी केलेली नाही अशा वापरकर्त्याने टाकलेला/प्रसिद्ध केलेला मजकूर अडवण्याचे तसेच त्या समाज माध्यम कंपनीस तसा आदेश देण्याचे अधिकार माहिती व नभोवाणी खात्यास देण्याचे घाटत आहे. त्यासाठी या भागात 'सुधारणा' केली जात आहे. 'नियंत्रण' हा त्या मागचा हेतू स्पष्ट आहे.

**टीका रोखणे हा हेतू**

माहिती तंत्रज्ञानाचे नियमन करण्यासाठी मोदी सरकारने २०२१ मध्ये नियमावली आणली. मध्यस्थांसाठी मार्गदर्शक तत्त्वे व डिजिटल माध्यमांसाठी नीतिमत्ता नियम २०२२ मध्ये त्यात समाविष्ट करण्यात आले. त्यामध्ये 'बनावट वृत्त' (फेक न्यूज) याचा अंतर्भाव होता, त्याची व्याप्ती 'सुधारणेत' वाढवून 'सरकारी कामकाज' हे शब्द समाविष्ट करण्यात आले. ऑन लाईन माध्यमांवरील सरकारी कामकाजाशी संबंधित मजकूर 'बनावट', 'दिशाभूल करणारा' असल्याचे वाटल्यास तो काढून टाकण्याचे आदेश देण्याचे अधिकार 'पीआयबी'च्या फॅक्ट चेक युनिटला देण्यात आले होते. ही दुरुस्ती मुंबई उच्च न्यायालयाने २०२४ मध्ये 'घटनाविरोधी ठरवून' फेटाळली होती. तरीही 'ऑन लाईन' परवानगीस सरकारी नियमांत 'सेफ हार्बर' म्हटले जाते. ते संरक्षण कायम राहाण्यासाठी समाज माध्यमांनी / व्यासपीठांनी या नियमांचे पालन केले पाहिजे अशी 'सूचना' नव्या दुरुस्तीत आहे. त्यास धमकी का म्हणू नये? आपल्या धनिक मित्रांमार्फत देशातील अनेक दूरचित्रवाहिन्या, काही ऑनलाईन वृत्त वाहिन्या मोदी सरकारने ताब्यात घेतल्या आहेतच. तरीही इंटरनेटवर अनेक व्यासपीठे जनतेच्या भावनांना स्थान देत असतात. नव्या दुरुस्ती किंवा 'सुधारणे' नंतर तसे करणे त्यांना अवघड बनेल. २०२१ च्या नियमावलीतील समाज माध्यमांशी संबंधित नियमांच्या भाग २ मध्येही दुरुस्ती सुचवली गेली आहे. सरकारचे धोरण, निर्णय यांवर कोणीही टीका केल्यास, सत्ताधीशांविरुद्ध मत व्यक्त केल्यास किंवा वेगळा विचार मांडल्यास तो मजकूर काढून टाकला जाईल असा या दुरुस्ती मागचा हेतू आहे हे स्पष्ट दिसत आहे. कालांतराने हे नियम वृत्तपत्रांनाही लागू होणार नाहीत याची खात्री काय? अन्यथा 'मुक्त' लेखकांवर निर्बंध आणण्याचे दुसरे कारण काय असू शकते?

# तांदळाचे पापड

साहित्य - १ किलो तांदूळ, लाल तिखट, पापडखार, हिंग, मीठ.कृती - तांदूळ स्वच्छ धुवून वाळवून ते दळून आणावे, १ भांडे पिठाला १ भांडे पाणी देऊन त्यात अर्धा चमचा हिंग पावडर, १ चमचा मीठ, अर्धा चमचा पापडखार व १ चमचा लाल तिखट पाण्यात घालावे. पाण्याला उकळी आल्यावर त्यात १ भांडे तांदळाचे पीठ घालून मंद विस्तवावर पिठाची उकड करावी, उकडीला दोन वाफा आल्यावर ढवळून गॅस बंद करावा. गरम असतांनाच पीठ तेलाच्या हाताने मळून घ्यावे व तेलाच्या हाताने एकसारख्या लाटया तयार करून तेलावरच पापड लाटावेत. टीप - ह्या पापडाचे पीठ एक वेळेला १ भांडयाचेच करावे, नाहीतर पीठाचा चिकटपणा गार झाल्यावर कमी होऊन पापड लाटतांना फाटतात.तांदळाच्या पापडया .साहित्य - १ किलो जुने सुवासिक तांदूळ, मीठ, हिंग पावडर, १ टे. स्पून खसखस. कृती - तांदूळ स्वच्छ धुवून वाळवून ते दळून आणावे, १ भांडे पिठाला ३ भांडे पाणी, मीठ, हिंगपूड व खसखस घालून मिश्रण कालवावे. गॅसवर ठेवून गुठळी होऊ न देता मिश्रण हलवावे व पीठ शिजवून घ्यावे. वाटल्यास अर्धे भांडे पाणी आणखी घालावे.टीप - वरील पिठाच्या पीठ गरम असताना प्लॅस्टिकच्या कागदावर मोठया पातळ पापडया घालाव्यात. दुसर्या दिवशी उलटया बाजूकडून वाळवाव्यात व खडखडीत वाळल्यावर डब्यात भराव्यात.



# या फळाचे नियमित सेवन ठरेल फायदेशीर



आपल्या आरोग्यासाठी फळे ही अंत्यत फायदेशीर असतात. त्यामुळे फळांच सेवन करणं महत्वाचं मानलं जातं. यापैकीच चिकू हे फळ अनेकांना आवडतं. तसेच, चिकू हे फळ चवीलाही स्वादिष्ट असून हे आपल्या शरीरासाठी गुणकारी फळ आहे. चिकू हे फळ हृदय आणि रक्तवाहिन्यांपासून ते किडनीपर्यंतच्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानले जाणारे फळ आहे.

चिकू फळाचं सेवन केल्यानं हृदयविकाराचा धोका कमी होण्यास आणि हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत मिळते. या फळामुळे हृदय आणि रक्ताभिसरण प्रक्रिया सुरळीत होण्यास मदत होते. तसेच, चिकू हे फळ दिसायला छोटं असलं तरी यामध्ये पोटॅशियम, मॅग्नेशियम, लोह, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए आणि फायबर हे घटक मोठ्या प्रमाणात असतात. हे सर्व घटक एकत्रितपणे हृदय आणि रक्तवाहिन्यांचे आरोग्य सुधारण्यास फायदेशीर ठरतात.

पोटॅशियममुळे रक्तदाब नियंत्रित राहतं. तसेच, यामुळे उच्च रक्तदाबाचा धोका कमी होण्यास मदत होते. मॅग्नेशियम रक्तवाहिन्यांना आराम देतं आणि धमन्यांमध्ये 'प्लाक' जमा होण्यापासून रोखण्यास मदत करते.आयुर्वेदेताही चिकूला फार महत्व असून हे फळ आपल्या शरीरातील रक्ताची कमतरता किंवा निमियाची समस्या दूर करण्यासाठी उपयुक्त ठरते. तर, यामध्ये असलेले लोह आणि फॉलिक सिडमुळे लाल रक्तपेशींच्या निर्मिती होण्यास मदत मिळते. चिकू फळाचं सेवन नियमितपणे केल्याने शरीरातील हिमोग्लोबिनची पातळी वाढण्यास मदत होते. तसेच, शरीरातील ऑक्सिजनचा पुरवठाही सुधारण्यासाठी चिकू फायदेशीर ठरते.चिकू फळात असणारे अँटी-ऑक्सिडंट्स शरीरातील विषारी घटक बाहेर टाकण्यास उपयुक्त ठरतात. तसेच, यामुळे किडनीवरील अतिरिक्त ताण कमी होण्यास मदत होते.चिकू हे फळ एक स्वस्त आणि मस्त असं फळ असून यामुळे आपली पचनसंस्थाही निरोगी राहते. तसेच, चिकूमुळे पचनासंबधित असलेल्या समस्या कमी होण्यास मदत होते. त्यामुळे, चिकू या फळाचं नियमितपणे सेवन करणं आपल्या शरीरासाठी अंत्यत फायदेशीर ठरते.

# दही आणि ताक या दोन्हीपैकी उन्हाळ्यात पोटाच्या आरोग्यासाठी काय भारी ?

मुंबई : उन्हाळ्याचा तडाखा मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. त्यामुळे अनेकजण उन्हाळ्यात दही आणि ताक घेणं पसंत करतात. उन्हाळ्याची सुरुवात होताच बऱ्याच घरांमध्ये जेवताना नियमितपणे दही किंवा ताकाचं सेवनं करतात. या दोन्ही पदार्थांमध्ये प्रोबायोटीक्स अर्थात पोटासाठी फायदेशीर ठरणारे बॅक्टेरिया असतात. मात्र, फार कमी लोकांना हे माहित आहे की यापैकी आपल्या पोटाच्या आरोग्यासाठी नेमकं काय फायदेशीर आहे? चला तर जाणून घेऊयात दही आणि ताक या दोन्हींपैकी नक्की काय फायदेशीर ठरेल याबद्दल.



दह्यात प्रोटीन आणि व्हिटॅमिन्स भरपूर प्रमाणात असतात. यामुळे शरीराला ऊर्जा मिळते. जर तुम्हाला वजन वाढवायचं असेल किंवा हाडे मजबूत करायची असतील, तर दही उत्तम आहे. आयुर्वेदानुसार, दही हे निसर्गात उष्ण प्रवृत्तीचं मानलं जातं. दही खाल्यानंतर पोटातील उष्णतेमुळे त्याचे आंबवण्याचे कार्य वाढते, ज्यामुळे काही लोकांना सिडिटी किंवा पोट फुगणे यांसारख्या समस्या उद्भवतात. दहीमध्ये ऊर्जेचं स्तोत्र मोठ्या प्रमाणात असतं. पण हे पचनासाठी जड मानलं जातं.

जर तुम्हाला दही खायचे असेल, तर ते दुपारच्या जेवणात खावं. रात्री दही खाणं टाळावं, कारण यामुळे कफ वाढण्याची शक्यता असते.

ताक हे दह्यापासून बनवलं जातं. पण त्यामध्ये पाणी मिसळ्यामुळे आणि घुसळ्यामुळे त्याचे गुणधर्म पूर्णपणे बदलतात. आयुर्वेदात ताकाला 'तक्र' म्हटलं जातं, ज्याची तुलना अमृताशी केली गेली आहे. दह्याच्या विरुद्ध, ताक हे निसर्गात अत्यंत शीत अर्थात थंड असतं. हे शरीराचं तापमान त्वरित कमी करण्यास मदत करतं आणि ताक पचायलाही हलकं असतं. जर तुम्हाला अपचन, गॅस किंवा सिडिटीचा त्रास असेल, तर ताक हे सर्वोत्तम पेय आहे. उन्हाळ्यात शरीरातील पाणी आणि इलेक्ट्रोलाईट्स घामाद्वारे बाहेर पडतात. ताक प्यायल्याने शरीरातील पाण्याची पातळी टिकून राहते आणि थकवा दूर होण्यास मदत मिळते.

उन्हाळ्यात दह्यापेक्षा ताक पिणं जास्त फायदेशीर ठरतं. दही हे पचायला जड असल्यानं उन्हाळ्यात पचनशक्ती मंदावलेली असताना ताक घेणं अधिक फायदेशीर ठरतं.

## देवाचा तराजू

देवा तुझ्या तराजूला  
एक पारडे जड का?  
माणसाच्या ठोकळयाला  
दोन हाती माप का?  
दुर्जनांच्या परिपत्या  
जन्मतो तो तूच ना?  
हिंदवीला आग-याची  
मग सांग ना कैद का?  
शुभ्रतेच्या ज्योतीसंगे  
काजळी किनार का?  
जीवनाच्या धुंद क्षणी  
आसवांची धार का?  
बेरजेचा गोफ झुले एखाद्याच्याच  
भाळी  
कुण्या येती नशीबी  
केवळ वेदनांची जाळी  
निर्जीव हया बाहुल्याला  
विकारांची चेतना का?  
दिव्यत्वाच्या झेपेसाठी  
अपूर्णतेचा शाप का?  
निर्मितीचा आनंद का रे  
वैचित्र्यात शोधतोस?  
संभ्रमाच्या तराजूत का रे मान-  
वाला तोलतोस?

**यतीन सामंत**

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा




आपल्या दोघांमधील नात घट्ट करण्यासाठी एकमेकांसोबत वेळ घालवून बोलण गरजेच आहे. यामुळे तुम्ही तुमची वैवाहीक जीवन चांगले एन्जॉय करू शकता आणि तुमचा पार्टनर तुमच्या जवळ येण्यास मदत होईल चांगल्या वैवाहीक जीवनासाठी तुमचे आरोग्य चांगल असणे महत्वाचे आहे, आणि त्यासाठी चांगले भोजन, व्यायाम आणि झोप घेणे गरजेचे आहे.या काही वैवाहीक टिप्स मुळे तुम्ही तुमची लाइफ खूप चांगली प्रकारे जगू शकता तसेच तुमच्या मध्ये असलेले मतभेद सुद्धा दूर होण्यास मदत होऊल.

## २ Joke विनोद




छोटी सुमन बाबांना विचारते, ङ्गबाबा लोणचे फार महाग असते का?फ बाबा म्हणतात, ङ्गनाही, पण तू का विचारतेस?फ सुमन रडत रडत म्हण-ते, ङ्गसकाळी माझ्या हातून थोडसे लोणचे तुमच्या नव्या सदऱ्यावर सांडले तर आई केवढे ओरडली.फ

## ३ Message संदेश



Tujse dosti karne ka hisab na aya,  
mere kisi bhi sawal ka jawab na aya,  
hum to jagte rahe tere hi khayalo me,  
aur tujhe so kar bhi hamara khawab na aya

## ४ Thought सुविचार



परमेश्वर तरल आहे, परंतु विद्वेषपूर्ण नाही.


अल्बर्ट आइनस्टाइन

**संस्कृत सुभाषित**

**विद्या नसे ज्या तप दान नाही ।**  
**न ज्या गुण ज्ञान न शील काही ।।**  
**न धर्म भूमिप्रति भारकारी ।**  
**पशूच ते मानव देहधारी ।।**

अर्थ -त्याग, श्रीगुरुंची कृपा, सत्यवाणी, शौर्य, अंत:करणाची निश्चलता व निरोगीपणा अशा गुणांची येथे प्रशंसा केली आहे.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. शहिदांचे दिल्ली येथील स्मारक '--- --- ज्योती'  
६. निर्णय  
९. समुद्रकिनारा  
१२. हिंदीत पशू  
१४. डुक्कर  
१५. गायीचे पिल्लू  
१६. मुरुमाची जमीन  
१८. रमापती  
२०. खराब झालेला आंबा  
२१. व्यक्ती, मनुष्य  
२३. अनुयायी, पायदळातील शिपाई  
२५. स्वामी  
२६. समुद्र  
२७. जास्तीत जास्त व कमीत कमी  
२९. चालविणारा अवयव  
३०. दारूचा एक प्रकार  
३२. मलई  
३३. दिवस  
३४. मध  
३६. सर्वस्व  
३७. गाय  
३८. खाली मान घातलेला  
४०. रत्न  
४२. श्रीविष्णुचे बटुरूप  
४६. होडी  
४७. आई  
४८. वरपांगी, दिखाऊ  
४९. मीठाची चव  
५०. तीव्र ऊन  
५२. भूतकाळ  
५४. वाळवंट  
५५. लक्ष्मीचे एक नाव  
५७. नूतन  
६०. षष्ठीची देवता  
६२. वृक्ष  
६३. वर्ष, साल  
६५. अखेर  
६७. उद्यानंतरचा दिवस  
६९. वचक  
७०. क्रिकेटच्या खेळातील सहा धावांचा फटका  
७२. दाणे वगैरे कुटण्याचे पूर्वीचे साधन  
७४. वाईट, नासके  
७६. मकर  
७७. नवा जोम, चपळता  
८०. हात  
८१. माळेत हे ओवतात  
८२. माती नसलेली जमीन

### उभे शब्द

१. अव्यस्थित राहणारा  
२. अंत:करण  
३. गोव्यातील शिवशंभो  
४. सोन्याचा वस्त्रातील धागा  
५. शहर  
६. प्रतिनिधी निवडण्याची क्रिया  
७. तुरूंग  
८. लाट, हुक्की  
१०. एक शेंगभाजी  
११. आवड, रूची  
१२. तारूण्य  
१६. ठेकेदार  
१७. आईचा भाऊ  
१९. नवरदेवाची आई  
२२. संतोष, आनंद  
२४. गुणज्ञ  
२५. चित्रपटाचा हिरो  
२८. शेतकरी  
२९. गरीब, क्षुल्लक  
३०. दात  
३१. जन्म-मृत्यू  
३३. पृथ्वीभोवतीचे हवेचे आवरण  
३५. रंगवलेले  
३९. पुरुषांचे नेसण्याचे हे वस्त्र आता कालबाह्य होत चाललेय  
४०. प्रजा  
४१. खास, विशेष हकीगत  
४२. शेतजमीन  
४३. गोदाम  
४४. पदार्थ शिजतानाचा आवाज  
४७. पत्ता  
५१. रड्या माणूस  
५३. कर्ण  
५६. खवा  
५८. 'दारु' मोजण्याने बदनाम झालेले माप  
५९. गाडीचे छत  
६०. प्रश्न  
६१. मुस्लिमांचा एक सण  
६४. नट्टापट्टा  
६६. बंगाली रुपया  
६८. शुष्कता  
७१. सुंदर तरुणी  
७३. फणसाचा एक प्रकार  
७४. गाढव  
७५. बगळा  
७८. रमणीय, मनोहारी  
७९. पद्धत

### आडवे उत्तर

१.अमर जवान ६.निकाल ९.सागरतट १२.जानवर १४.वराह १५.वासरू १६.मुरमाड १८.रमावर २०.नासका २१.माणूस २३.पाईक २५.नाथ २६.दर्या २७.कमाल किमान २९.पाय ३०.रम ३२.साय ३३.वासर ३४.मकरंद ३६.तनमनधन ३७.गो ३८.अधोवदन ४०.रतन ४२.वामनावतार ४६.तर ४७.माय ४८.वरवर ४९.खारट ५०.रणरण ५२.गतकाल ५४.रण ५५.रमा ५७.नविन ६०.सटवाई ६२.तरू ६३.सन ६५.शेवट ६७.परवा ६९.दरारा ७०.षटकार ७२.खलबत्ता ७४.खराब ७६.मगर ७७.तरतरी ८०.कर ८१.मणी ८२.खडकाळ

### उभे उत्तर

१.अजागळ २.मन ३.रवळनाथ ४.जर ५.नगर ६.निवडणूक ७.कारा ८.लहर १०.गवार ११.रस १२.तरूणाई १६.मुकादम १७.मामा १९.वरमाय २२.समाधान २४.कदरदान २५.नायक २८.किसान २९.पामर ३०.रद ३१.जनन मरण ३३.वातावरण ३५.रंगीत ३९.धोतर ४०.रयत ४१.नवलविशेष ४२.वावर ४३.वखार ४४.तार ४५.रटरट ४७.मागमूस ५१.रडतराऊत ५३.कान ५६.मावा ५८.नवटाक ५९.टप ६०.सवाल ६१.ईद ६४.नखरा ६६.टका ६८.रखरख ७१.रमणी ७३.बरका ७४.खर ७५.बक ७८.रम्य ७९.रीत




## थोडक्यात/ संक्षिप्त

### दिग्गज क्रिकेटरच्या तक्रारीनंतर पोलिसांनी अभिनेत्रीला केली अटक

मुंबई–एका सोनसाखळी चोरीच्या प्रकरणात प्रसिद्ध अभिनेत्रीला अटक करण्यात आली आहे. सुप्रसिद्ध क्रिकेटरने अभिनेत्रीला कायदेशीर नोटीस धाडल्यानंतर पोलिसांनी अभिनेत्रीला अटक केली आहे. क्रिकेटपटून धाडलेल्या नोटीसमध्ये सांगण्यात आलेय की, क्रिकेटपटून अभिनेत्रीला तात्पुरत्या स्वरूपात वापरण्यासाठी एक सोन्याची साखळी दिली होती. मात्र, त्या अभिनेत्रीने क्रिकेटपटूला कोणतीही कल्पना न देता, ९ लाखांची ही सोनसाखळी गहाण ठेवली. दुसरीकडे, माध्यमांमध्ये बोलताना मात्र, या अभिनेत्रीनं या घटनेची पूर्णपणे वेगळीच बाजू मांडलीय.श्रीलंकेचा क्रिकेटपटू भानुका राजपक्ष यानं अभिनेत्री हर्षी रसंगा हिला कायदेशीर नोटीस पाठवली होती, ज्यानंतर पोलिसांनी त्या अभिनेत्रीला अटक केली. हे प्रकरण एका सोन्याच्या साखळीशी संबंधित आहे. राजपक्ष यानं नोटीसमध्ये सांगितलंय की, त्यानं ती सोन्याची साखळी अभिनेत्री हर्षी हिला केवळ तात्पुरत्या स्वरूपात वापरण्यासाठी दिली होती. मात्र, त्या अभिनेत्रीनं राजपक्ष याला कोणतीही पूर्वकल्पना न देता, ९ लाख रुपयांची ही सोन्याची साखळी गहाण ठेवली. क्रिकेटर भानुका राजपक्ष याने कायदेशीर नोटीस धाडल्यानंतर अभिनेत्रीला अटक करण्यात आली आहे.कडुवेला दंडाधिकारी न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान, हर्षी रसंगा हिने आपण क्रिकेटपटू भानुका राजपक्ष याला न कळवता ती साखळी गहाण ठेवल्याचे कबूल केलंय. आपल्या वकिलांमार्फत हर्षीनं ती साखळी परत करण्याचे आश्वासन दिलंय. मात्र, जामीन मिळाल्यानंतर त्या अभिनेत्रीने यु–टर्न घेतला.

### तुम्ही खेळाडूंसाठी पैसे मोजले म्हणून...मोहम्मद शमीचे एलएसजी चे मालक गोयंकांबद्दल स्पष्ट विधान

**लखनऊ**–लखनऊ सुपरजायंट्स संघाने आपला पहिलाच सामना गमावला आहे. दिल्लीविरोधातील सामना जिंकता जिंकता लखनऊ संघाने गमावला असून, पराभूत झाले आहेत. ट्रिस्टन स्टब्स आणि समीर रिझवी यांनी केलेल्या भागीदाराच्या आधारे दिल्लीने १४१ धावसंख्येचा सहज पाठलाग केला. लखनऊचा पराभव झाल्यानंतर संघाचे मालक संजीव गोयंका यांचा कर्णधार ऋषभ पंतसोबत गंभीरपणे चर्चा करतानाचा व्हिडीओ समोर आला आहे. याआधी २०२४ मध्ये गोयंका यांनी के एल राहुल आणि त्यानंतर पंतसोबत केलेल्या चर्चेत व्हिडीओ समोर आले होते. यामध्ये संजीव गोयंका रागात दिसत होते. संजीव गोयंका ऋषभ पंतला जाब विचारत असावेत असा अंदाज अनेकांनी लावला आहे. सुपरजायंट्स संघाचे मालक संजीव गोयंका सामन्यात पराभव झाल्यानंतर नेहमी आपल्या कर्णधारावर संताप व्यक्त करतात अशी एक प्रतिमा निर्माण झाली आहे. यावर आता लखनऊचा जलद गोलंदाज मोहम्मद शमीने भाष्य केलं आहे. मोहम्मद शमीने संघाचा मालक इतका पझेसिव्ह असणं कितपत योग्य आहे यावरही आपलं मत मांडलं आहे. संजीव गोयंका यांचे आपल्या संघाच्या कर्णधारांसोबत वाद घालतानाचे काही व्हिडीओ व्हायरल झाले होते. यानंतर चाहत्यांनी त्यांच्या या वागण्यावर प्रश्न उपस्थित केले होते. यावर अनेक मीम्सही तयार झाले आहेत. दरम्यान मोहम्मद शमीने म्हटले आहे की, मफ्क्षातापर्यंत जितक्या वेळा माझी संजीव गोयंका यांच्याशी भेट जाली आहे .

### नागपूरमध्ये मयु-१७ राष्ट्रीय बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धा

**मुंबई**–महाराष्ट्राच्या बॉक्सिंग इतिहासात महत्त्वपूर्ण ठरणारी सातवी, १७ वर्षाखालील (अंडर १७) ज्युनिअर राष्ट्रीय बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धा येत्या पाच एप्रिल ते ११ एप्रिल २०२६ दरम्यान नागपूर येथे पार पडणाऱ्या स्पर्धेची अधिकृत घोषणा, महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष,शिवसेनेचे राष्ट्रीय सरचिटणीस माजी खासदार राहुल शेवाळे यांनी पत्रकार परिषदेत केली. दादरच्या स्वातंर्त्यवीर सावरकर स्मारक सभागृहात गुरुवारी दुपारी चार वाजता आयोजित करण्यात आलेल्या या पत्रकार परिषदेत संघटनेचे वरिष्ठ उपाध्यक्ष रणजीत सावरकर यांनी देखील संघटनेची भूमिका मांडली. नागपूर येथे पार पडणाऱ्या या स्पर्धेत देशभरातून निवड झालेल्या युवा खेळाडूंना आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवण्याची मोठी संधी मिळणार आहे.या प्रतिष्ठित स्पर्धेत तब्बल २५० महिला खेळाडू आणि ३५० पुरुष खेळाडू सहभागी होणार असून, एकूण सहाशेहून अधिक बॉक्सर्स यावेळी रिंगमध्ये उतरतील. त्यांच्यासोबत १८० प्रशिक्षक व टीम मॅनेजर्स, तसेच संघटनेच्या वतीने ७० अधिकृत कर्मचारी सहभागी होणार आहेत. पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना राहुल शेवाळे म्हणाले की, कंपनी ॲक्टनुसार तयार झालेल्या आमच्या संघटनेला बीएफआय (बॉक्सिंग फेडरेशन ऑफ इंडिया) ने मान्यता दिल्यामुळे कोणत्याही वादाचा प्रश्नच नाही. स्वातंर्त्यवीर सावरकरांचे नातू रणजीत सावरकर यांना पाठिंबा देण्यासाठी आणि महाराष्ट्रातल्या बॉक्सिंगपटूंच्या भविष्यासाठी सर्व जिल्हा संघटनांच्या सहकार्याने मी या क्षेत्रात प्रवेश केला आहे. संघटनेचे वरिष्ठ उपाध्यक्ष रणजीत सावरकर यांनी सांगितले .

# आयपीएल २०२६:सनरायझर्सचा केकेआरवर दणदणीत विजय

## घरच्या मैदानावर कोलकाता १६ षटकांत ऑलआऊट

**नवी दिल्ली**: सनरायझर्स हैदराबादने केकेआरचा घरच्या मैदानावर लाजिरवाणा पराभव केला आहे. या पराभवासह केकेआरने स्पर्धेतील सलग दुसरा सामना गमावला आहे. सनरायझर्स हैदराबाद संघाने आयपीएल २०२६ मधील दुसऱ्या सामन्यात अखेरीस विजयाचं खातं उघडलं आहे. हैदराबादने ईडन गार्डन्सच्या मैदानावर केकेआरचा तब्बल ६५ धावांनी दारूण पराभव केला आहे. सनरायझर्स हैदराबादने दिलेल्या २२७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना केकेआरचा संपूर्ण संघ १६१ धावांवर सर्वबाद झाला. हैदराबादने या सामन्यात खराब फिल्डिंग केल्याने केकेआरला अनेक धावा सहजी मिळाल्या पण संघाच्या गोलंदाजांनी मात्र उत्कृष्ट कामगिरी केली. कर्णधार इशान किशनच्या नेतृत्त्वाखाली हा संघाचा यंदाचा पहिला विजय आहे.



कॅप्टन इशानने उघडलं विजयाचं खातं

सनरायझर्स हैदराबादने दिलेल्या २२७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना केकेआरची सुरूवात दणक्यात झाली. फिन एलनने पहिल्याच षटकात २५ धावा कुटत संघाला वादळी सुरूवात करून दिली. यानंतर पुढच्याच षटकात हर्ष दुबेने आपल्या गोलंदाजीवर त्याला झेलबाद करत संघाला मोठी विकेट मिळवून दिली. एलन ७ चेंडूत २८ धावा करत बाद जाला. तर कर्णधार रहाणे ८ धावा करत माघारी परतला. तर अंगक्रिश रघुवंशीने पुन्हा एकदा संघाचा डाव सावरला. रघुवंशीने २९ चेंडूत ६ चौकार व २ षटकारांच्या मदतीने ५२ धावा केल्या आणि सलग दुसऱ्या सामन्यात अर्धशतक झळकावलं. तर उपकर्णधार रिंकू सिंहने ३५ धावांची खेळी करत संघाचा डाव सावरला, मात्र त्याला दुसऱ्या टोकावरून अपेक्षित साथ न मिळाल्याने धावांचं अंतर वाढत गेलं आणि परिणामी केकेआरने विकेट्सदेखील गमावल्या. केकेआरकडून जयदेव उनाडकटने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. यानंतर इशान मलिंगा आणि नितीश रेड्डी या दोघांनी २–२ विकेट्स घेतल्या. तर हर्ष दुबेने फिन एलनला बाद करत संघाला सर्वात मोठी विकेट मिळवून दिली.कोलकाता नाईट रायडर्स संघाने नाणेफेक जिंकत सनरायझर्स हैदराबाद संघाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं आणि हैदराबादने २२६ धावांचा डोंगर उभारला. ट्रॅव्हिस हेड व अभिषेक शर्माच्या जोडीने संघाला वादळी सुरूवात करून दिली. दोघांनी पॉवरप्लेमध्येच ८२ धावा कुटल्या. हेड ४६ धावा तर अभिषेक शर्मा ४८ धावा करत बाद झाले, त्यामुळे दोघांचही अर्धशतक हुकलं. यानंतर इशान १४ धावांवर, अनिकेत वर्मा १ धाव करत बाद झाले. त्यानंतर हेनरिक क्लासेन व नितीश रेड्डी यांनी ८२ धावांची भागीदारी रचत संघाला २०० धावांच्या पलीकडे नेलं.

अभिषेक शर्माच्या विकेटवरून पेटला वाद, वरूणने कॅच पकडला होता की नाही? तिसऱ्या पंचांकडून चूक? तखअएज

हेनरिक क्लासेनने ३५ चेंजूत ४ चौकार व १ षटकाराच्या मदतीने ५२ धावांची खेळी केली. तर नितीश रेड्डीने ३९ धावांचं योगदान दिलं. यानंतर हर्ष दुबेने २ चौकार लगावत संघाला संघाला २२६ धावांचा आकडा गाठून दिला. केकेआरकडून ब्लेसिंग मुझरबानीने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या. तर वैभव अरोराने २ विकेट्स आणि कार्तिक त्यागी व अनुकूल रॉय यांनी प्रत्येकी १–१ विकेट्स घेतल्या.

## कूपरमुळे पंजाबचा शानदार विजय

चंदीगड : श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील गत उपविजेत्या पंजाब किंग्जच्या संघाने गुजरात टायटन्सला पराभूत करत आयपीएलच्या नव्या हंगामातील मोहिमेची सुरुवात विजयासह केली. चंदीगडमधील मुल्लानपूरच्या महाराजा यादविंद्रसिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर अखेरच्या षटकापर्यंत रोमहर्षक झालेल्या सामन्यात पंजाब किंग्जच्या संघाने ३ बळी आणि पाच चेंडू राखून विजय नोंदवला. गुजरात टायटन्सनं दिलेल्या १६३ धावांचा पाठलाग करताना संघ अडचणीत असताना पदार्पणाचा सामना खेळणारा युवा ऑस्ट्रेलियन ऑलराउंडर कूपर कॉलॉनी संघाच्या मदतीला धावून आला. पंजाबच्या च्या नव्या हिरोनं पदार्पणातच एकहाती किल्ला लढवत खराब रेकॉर्ड असलेल्या घरच्या मैदानात संघाला विजय मिळवून दिला. इथं जाणून घेऊयात प्रितीच्या सह मालकीच्या संघातील नव्या हिरोसंदर्भातील सविस्तर माहिती पंजाब किंग्ज विरुद्ध गुजरात टायटन्स यांच्यातील लढतीनंतर कूपर कॉनॉली एका रात्रीत स्टार झाला आहे. ऑस्ट्रेलियन ऑलराउंडरचा जन्म पर्थमध्ये झाला. तो डावखुरा फलंदाज असून डावखुर्या हाताने फिरकी गोलंदाजीही करतो. २२ वर्षीय हा खेळाडू ऑस्ट्रेलियासाठी तिन्ही फॉरमॅटमध्ये खेळला आहे. आयपीएल आधी पंजाब किंग्जने त्याला ३ कोटी रुपयांना आपल्या ताफ्यात घेतले आणि हा त्याचा आयपीएलमध्ये पदार्पण सामना होता.२०२२ मध्ये झालेल्या १९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धेत त्याने ऑस्ट्रेलियाचे नेतृत्व केले होते. तसेच बिग बॅश लीग २०२२–२३ फायनलमध्ये त्याने ब्रिस्बेन हीटविरुद्ध नाबाद २५ धावांची खेळी करत पर्थ स्कॉर्चर्सला विजेतेपद मिळवून दिले होते. ऑस्ट्रेलियातील शेफिल्ड शिल्ड २०२३–२४ च्या हंगामातील फायनलमध्येही त्याने पदार्पणात ९० धावा करत आपली छाप सोडली. गतवर्षी त्याने श्रीलंकेविरुद्ध कसोटी पदार्पण केले असून ऑस्ट्रेलियासाठी तो एकदिवसीय आणि टी–२० सामनेही खेळला आहे.

४४ चेंडूत ५ चौकार आणि ५ षटकारांच्या मदतीने कूपर कॉलॉनी याने ७२ धावांची नाबाद मॅच विनिंग खेळी केली. दमदार कामगिरीसाठी त्याला पदार्पणाच्या सामन्यातच सामनावीर पुरस्कार मिळाला. सामनावीर पुरस्कार स्वीकारताना तो म्हणाला की, ही स्पर्धा सोपी नाही. इथं फक्त चांगला अनुभव घेण्याचा विचार करुन आलो आहे. चांगली कामगिरी करता आली याचा आनंद आहे. हा संघाचा विजय आहे. काही दिवस विश्रांती घेतल्यानंतर मी नव्याने सुरुवात करण्याचा निर्णय घेतला याचा मला फायदा झाला.



### बीसीसीआयकडून भारतीय संघाच्या झिम्बाब्वे दौऱ्याचे वेळापत्रक जाहीर

मुंबई–भारतीय संघ यावर्षी जुलैमध्ये झिम्बाब्वेचा दौरा करणार असून, यजमान संघाविरुद्ध तीन सामन्यांची टी–२० मालिका खेळणार आहे. बीसीसीआयने बुधवारी (१ एप्रिल) भारताच्या झिम्बाब्वे दौऱ्याला दुजोरा देत वेळापत्रक जाहीर केले. भारत आणि झिम्बाब्वे यांच्यात २३ ते २६ जुलै दरम्यान तीन सामन्यांची टी–२० मालिका खेळवली जाईल. तिन्ही सामने हरारे येथे खेळले जाणार आहेत.

भारतीय संघाचे बहुतेक क्रिकेटपटू सध्या आयपीएल २०२६ मध्ये व्यस्त आहेत आणि त्यानंतरही त्यांना विश्रांतीसाठी वेळ मिळणार नाही. लीग संपल्यानंतर संघाला आंतरराष्ट्रीय मालिकांची मालिका खेळावी लागेल. अफगाणिस्तानविरुद्धची मायदेशातील मालिका आणि इंग्लंड आणि आयर्लंडच्या परदेश दौऱ्यानंतर, भारतीय संघ झिम्बाब्वे दौऱ्यावर जाणार आहे.गेल्या चार वर्षांतील भारताचा हा झिम्बाब्वेचा तिसरा दौरा असेल. यापूर्वी, संघाने २०२२ मध्ये तीन एकदिवसीय सामन्यांसाठी आणि त्यानंतर २०२४ मध्ये पाच टी–२० सामन्यांच्या मालिकेसाठी झिम्बाब्वेचा दौरा केला होता. जुलैमध्ये होणाऱ्या टी–२० मालिकेनंतर काही महिन्यांनी, भारताच्या यजमानपदाखाली दोन्ही देशांमध्ये एकदिवसीय मालिका खेळली जाईल. २००२ नंतर दोन्ही देश भारतात मालिका खेळण्याची ही पहिलीच वेळ असेल.

आयपीएल संपताच, भारतीय संघ मायदेशात खेळल्या जाणाऱ्या अफगाणिस्तानविरुद्धच्या कसोटी आणि एकदिवसीय मालिकेची तयारी सुरू करेल. दोन्ही संघ एक कसोटी आणि तीन एकदिवसीय सामने खेळतील. यानंतर, संघ इंग्लंडला जाईल, जिथे ते तीन एकदिवसीय आणि एक टी–२० मालिका खेळतील. या दौऱ्यादरम्यान, भारतीय संघ झिम्बाब्वेला जाण्यापूर्वी एका टी–२० मालिकेसाठी आयर्लंडलाही जाईल.भारताचा झिम्बाब्वे दौरा२३ जुलै, पहिला टी२० सामना, हरारे२५ जुलै, दुसरा टी२० सामना, हरारे२६ जुलै, तिसरा टी२० सामना, हरारे

## पराभव कोणामुळे झाला? अजिंक्य रहाणेने सांगितलं पराभवाचं कारण; सामन्यानंतर म्हणाला

**नवी दिल्ली**: कोलकाता नाईट रायडर्स संघाला सलग दुसऱ्या सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला आहे. स्पर्धेतील पहिल्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्स संघाला मुंबई इंडियन्स संघाकडून पराभवाचा सामना करावा लागला होता. या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्स संघातील गोलंदाज फ्लॉप ठरले होते. आता आपल्या होम ग्राऊंडवर खेळताना कोलकाता नाईट रायडर्स संघाने फ्लॉप फलंदाजीमुळे सामना गमावला आहे. हा सामना ६५ धावांनी गमावल्यानंतर कर्णधार अजिंक्य रहाणेने पराभवाचं कारण सांगितलं आहे.कोलकाता नाईट रायडर्स संघाला चांगली सुरुवात मिळाली होती. पण हवा तसा शेवट करता आला नाही. सामना झाल्यानंतर बोलताना अजिंक्य रहाणे म्हणाला, ङ्गआमच्या फलंदाजांनी मोठी पार्टनरशिप केली. ते सेट झाले होते, पण त्यांनी डाव पुढे घेऊन जाणं गरजेचं होतं. गोलंदाजीबद्दल बोलायचं झालं, तर आम्ही शेवटच्या ७–८ षटकात दमदार पुनरागमन केलं. सुरुवातीच्या १० षटकात ते १३०–१४० धावांच्या जवळ पोहाचले होते, पण त्यानंतर आम्ही चांगली गोलंदाजी केली.असं कोणाला आवडेल?ङ्घ मुंबईची साथ सोडल्यानंतर अर्जुन तेंडुलकरचं मोठं वक्तव्य; भारताकडून खेळण्याबाबत म्हणाला:तसेच तो पुढे म्हणाला की, ङ्गधावांचा पाठलाग करत असताना मोठी पार्टनरशिप होणं गरजेचं असतं.



दुसऱ्या डावात चेंडू थोडा थांबून येत होता. पहिल्या डावाच्या तुलनेत स्लो चेंडू जास्त ग्रीप होत होते. खेळपट्टी फलंदाजीसाठी चांगली होईल, असं वाटलं होतं पण चेंडू थांबून येत होता.कोलकाता नाईट रायडर्स संघाला घरच्या मैदानावर खेळताना पराभवाचा सामना करावा लागला आहे. याबाबत बोलताना अजिंक्य रहाणे म्हणाला, ङ्गनक्कीच घरच्या मैदानावर विजय मिळवणं खूप महत्वाचं असतं. त्यामुळे आम्हाला आता पुन्हा एकदा विचार करावा लागेल. टीम कॉम्बिनेशनवर लक्ष द्यावं लागेल. जर गोलंदाजीमध्ये बदल करून एक जास्तीचा फलंदाज घेता आला, तर त्याबद्दलही विचार करावा लागेल. या सामन्यात सनरायझर्स हैदराबाद संघाने ६ गडी बाद २२६ धावा केल्या होत्या. २२७ धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या कोलकाता नाईट रायडर्स संघाकडून अंगकृष रघुवंशीने सर्वाधिक ५२ धावांची खेळी केली. तर रिंकू सिंगने ३५ धावा केल्या. अजिंक्य रहाणे अवघ्या ८ धावा करून माघारी परतला. तर फिन ॲलेनने २८ धावा केल्या. पण कोलकाता नाईट रायडर्स संघाचा संपूर्ण डाव १६१ धावांवर आटोपला.

### वैभव सूर्यवंशीकडून ८ मॅचमध्येच सचिन तेंडुलकरच्या कामगिरीची बरोबरी

नवी दिल्ली–इंडियन प्रीमिअर लीगला सुरुवात होऊन आज १९ व्या हंगामातील सहावा सामना कोलकाता नाईट रायडर्स आणि सनरायजर्स हैदराबाद यांच्यात सुरु आहे. मात्र, भारतीय क्रिकेटचा उगवता तारा वैभव सूर्यवंशी सध्या चर्चेत आहे. वैभव सूर्यवंशीनं आयपीएलमधील आठव्या सामन्यातच दमदार कामगिरी केली आहे. वैभव सूर्यवंशीनं भारतीय क्रिकेटचा देव अशी ओळख असलेल्या सचिन तेंडुलकरच्या आयपीएलमधील एका कामगिरीची बरोबरी केली आहे. वैभव सूर्यवंशीनं त्याच्या आक्रमक फलंदाजीच्या जोरावर आधुनिक क्रिकेटमध्ये इम्पॅक्ट देखील महत्त्वाचं असल्याचं दाखवून दिलं आहे. वैभव सूर्यवंशीनं आतापर्यंत आयपीएलमध्ये ८ मॅच खेळल्या आहेत. या सामन्यांमध्ये वैभव सूर्यवंशीनं २९ षटकार मारले आहेत.

### मला खेळायला द्या... आरसीबी चा स्टार कोर्टात, आयपीएल सुरू होताच मोठी कॉन्ट्रोव्हर्सी!

मुंबई–आयपीएल २०२६ चा मोसम सुरू झाला असून सर्व १० टीमनी त्यांच्या पहिल्या मॅच खेळल्या आहेत. गतविजेती आरसीबी आणि सनरायजर्स हैदराबाद यांच्यात या मोसमाचा पहिला सामना झाला, ज्यात आरसीबीने दणदणीत विजय मिळून मोसमाची सुरूवात केली, पण आरसीबीच्या टीमला मोसमाच्या आधीपासूनच दुखापतींचं ग्रहण लागलं आहे. टीमचा हुकमी एक्का असलेला जॉश हेजलवूड अजूनही फिट झालेला नाही, त्यामुळे क्रिकेट ऑस्ट्रेलियाने जॉश हेजलवूडला खेळण्याची परवानगी दिलेली नाही.

आरसीबीचा स्टार कोर्टात

जॉश हेजलवूडच्या गैरहजेरीमध्ये आरसीबीला श्रीलंकेचा फास्ट बॉलर नुवान तुषाराकडून अपेक्षा होत्या, पण नुवान तुषारालाही श्रीलंकन क्रिकेट बोर्डाने खेळण्यासाठी एनओसी दिलेली नाही, त्यामुळे तो अजूनही आरसीबीच्या टीमममध्ये सामील झालेला नाही. एनओसी मिळत नसल्यामुळे आता नुवान तुषारा कोर्टात गेला आहे.फिटनेस टेस्ट पास न झाल्यामुळे श्रीलंका क्रिकेट बोर्डाने नुवान तुषाराला एनओसी दिली नाही. ३१ वर्षांच्या तुषाराला आरसीबीने विकत घेतलं आहे. नुवान तुषाराने कोलंबोच्या जिल्हा न्यायालयात या प्रकरणी दाद मागितली आहे, तसंच बोर्डाला एनओसी द्यायचे आदेश दिले जावेत, अशी मागणी केली आहे. ९ एप्रिलला याप्रकरणाची सुनावणी होणार आहे. श्रीलंकेतील स्थानिक मीडियाने दिलेल्या वृत्तानुसार नुवान तुषाराचा श्रीलंका क्रिकेट बोर्डासोबतचा करार ३१ मार्चला संपला होता, तसंच हा करार पुढ न वाढवण्याचा निर्णय तुषाराने घेतला आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आपल्याला खेळायचं नसल्याचं तुषाराने बोर्डाला सांगितलं आहे.

## भारतीय क्रिकेट संघ जुलैमध्ये झिम्बाब्वे दौर्यावर

मुंबई : भारतीय क्रिकेट संघ टी–२० मालिकेसाठी झिम्बाब्वे दौर्यावर जाणार आहे. हा दौरा जुलै महिन्यात होणार असून, टीम इंडियाच्या वेळापत्रकात आणखी एका मालिकेची भर पडली आहे. भारत आणि झिम्बाब्वे यांच्यात तीन सामन्यांची टी–२० मालिका खेळवली जाणार आहे. या मालिकेतील तिन्ही सामने हरारे येथे पार पडणार आहेत. पहिला टी–२० सामना २४ जुलै रोजी, दुसरा २५ जुलैला तर तिसरा आणि अंतिम सामना २६ जुलैला खेळवला जाणार आहे. विशेष म्हणजे, झिम्बाब्वे दौर्यापूर्वी भारत आयर्लंडविरुद्ध दोन टी–२० सामने खेळेल. त्यानंतर इंग्लंडविरुद्ध पाच सामन्यांची टी–२० मालिका खेळून



टीम इंडिया झिम्बाब्वेकडे रवाना होईल. भारतीय संघाने झिम्बाब्वेचा शेवटचा दौरा जुलै २०२४ मध्ये केला होता. त्या वेळी दोन्ही संघांमध्ये पाच सामन्यांची टी–२० मालिका खेळवण्यात आली होती. या मालिकेसाठी स्टार फलंदाज शुभमन गिल याच्याकडे भारतीय संघाची कर्णधारपदाची जबाबदारी होती.

**सामना, हरारे**
२५ जुलै २०२६ : दुसरा टी–२० सामना, हरारे२६ जुलै २०२६ : तिसरा टी–२० सामना, हरारे

मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताला झिम्बाब्वेकडून पराभवाचा धक्का बसला होता. मात्र त्यानंतर टीम इंडियाने दमदार पुनरागमन करत सलग चार सामने जिंकले आणि ४–१ अशा फरकाने मालिका आपल्या नावावर केली.

पुढील वर्षी म्हणजे जानेवारी २०२७ मध्ये झिम्बाब्वेचा संघ भारत दौर्यावर येणार आहे. या दौर्यात तीन सामन्यांची वनडे मालिका खेळवली जाणार आहे. या मालिकेतील सामने कोलकाता, हैदराबाद आणि मुंबई येथे रंगणार आहेत. अलीकडे झालेल्या टी–२० वर्ल्ड कप २०२६ मध्येही भारत आणि झिम्बाब्वे यांच्यात सामना रंगला होता.

सुपर ८ फेरीत दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात भारतीय संघाने सहज विजय मिळवला. नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करत टीम इंडियाने ४ गडी गमावून तब्बल २५६ धावा केल्या. २५७ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना झिम्बाब्वेचा संघ २० षटकांत ६ बाद १८४ धावांपर्यंतच मजल मारू शकला. परिणामी भारताने हा सामना तब्बल ७२ धावांनी जिंकला.

भारताच्या झिम्बाब्वे दौर्याचे वेळापत्रक
२३ जुलै २०२६ : पहिला टी–२०

# अचूक मतदार यादी म्हणजे लोकशाहीची मजबूत पायाभरणी - किरीट सोमय्या

## - औसा विधानसभा कार्यशाळेत मतदार यादी शुद्धीकरणावर भर
## - किरीट सोमय्या यांचे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन



**औसा/प्रतिनिधी :** औसा विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पार्टीच्या वतीने दि. २ एप्रिल रोजी औसा येथे आयोजित विधानसभास्तरीय कार्यशाळेत मतदार यादी विशेष सखोल पुनरावलोकन अभियान' अंतर्गत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन सत्र उत्साहात पार पडले. या कार्यशाळेत भाजपा नेते तथा माजी खासदार किरीट सोमय्या यांनी मतदार यादी शुद्धीकरण' या विषयावर कार्यकर्त्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला औसा मतदारसंघाच्या वतीने किरीट सोमय्या यांचे मनःपूर्वक स्वागत करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी मतदार यादी अचूक व पारदर्शक ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित करत, मतदार यादी अचूक आणि सक्षम करणे ही लोकशाहीची मजबूत पायाभरणी आहे. त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याने या अभियानात सक्रिय सहभाग घेऊन हे अभियान यशस्वी करावे, असे आवाहन केले. आपल्या भाषणात सोमय्या यांनी मागील १५ ते २० वर्षांतील वाढलेल्या मतदान टक्केवारीचा संदर्भ देत काही गंभीर मुद्दे उपस्थित केले. काही ठिकाणी बोगस मतदानाचा वापर झाल्याचा दावा करत, बांगलादेशी, पाकिस्तानी व रोहिंग्या घुसखोरांची नावे मतदार यादीत समाविष्ट होऊ नयेत, यासाठी मतदार यादी विशेष पुनरावलोकन अभियान प्रभावीपणे राबवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. तसेच, आपल्या भागात खरे भारतीय मतदार आहेत का, याची सखोल पाहणी या अभियानांतर्गत करणे आवश्यक आहे, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी त्यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भारताला महासत्ता बनवण्याच्या स्वप्नाचा उल्लेख करत, ते स्वप्न साकार करण्यासाठी देशात शत-प्रतिशत भाजप सत्तेची आवश्यकता असल्याचे ठाम मत व्यक्त केले.कार्यक्रमात औसा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार यांनीही उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी देशाच्या विकासासाठी राज्य व केंद्रात भाजपची सत्ता कायम ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. देशाचा पंतप्रधान आणि राज्याचा मुख्यमंत्री निवडण्याचा अधिकार केवळ भारतीय नागरिकांना आहे. रोहिंग्या, बांगलादेशी किंवा पाकिस्तानी घुसखोरांना हा अधिकार नाही, असे स्पष्ट मत त्यांनी मांडले.

कार्यक्रमास प्रा. भीमाशंकर राच्चाटे, बाजार समितीचे सभापती चंद्रशेखर सोनवणे, पंचायत समिती सभापती गंगाबाई कोदळीकर, भाजपचे जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता, माजी नगराध्यक्ष सुनील मिटकरी, सुनील उटगे, रवी चिलमे, सुभाष जाधव, नाना धुमाळ, काकासाहेब मोरे आदींसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यशाळेमुळे औसा मतदारसंघात मतदार यादी शुद्धीकरण अभियानाला अधिक गती मिळणार असून, कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून हे अभियान यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. भीमाशंकर राच्चाटे यांनी तर आभार सुनील मिटकरी यांनी व्यक्त केले तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीर डेंग यांनी केले.

# श्री हनुमान जयंती निमित्ताने माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी घेतले मांजरेश्वर हनुमानाचे दर्शन



**लातूर/प्रतिनिधी :** शक्ती आणि ज्ञानाचे प्रतीक असलेले व दुःख नाहीसे करणारे संकटमोचन श्री हनुमान यांच्या जन्मोत्सव निमित्ताने राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांनी गुरुवारी विलासनगर १२ नंबर पाटी येथील श्री मांजरेश्वर हनुमान मंदिरात जाऊन दर्शन घेतले आरती केली मनोभावे सेवा केली आशिर्वाद घेतला यावेळी मंदिर संस्थानच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी विविध मान्यवर भक्तगण मोठ्या संख्येने. उपस्थित होते

यावेळी राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे मांजरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अशोक अप्पा काळे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संतोष देशमुख, रेणा साखर कारखान्याचे अध्यक्ष अनंतराव देशमुख जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव,जिल्हा परिषद सदस्य दत्तात्रय टेकाळे, गुरुनाथ गवळी पंचायत समिती उपाध्यक्ष महेश चव्हाण, मांजरा साखर कारखान्याचे संचालक तात्यासाहेब देशमुख वसंतराव उपाडे धनराज दाताळ नीलकंठ पवार, दयानंद बिडवे सूरेश चव्हाण विकास देशमुख, संभाजी सुळ,राजेन्द्र भोसले, बाळासाहेब कदम प्रा शशिकांत कदम हरीराम कुलकर्णी प्रदीप चव्हान मांजरा साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक पंडित देसाई यांच्या सह मान्यवर उपस्थित होते

साई मंदिर बाभळगाव येथील हनुमान मंदीरात माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी घेतले दर्शन

श्री हनुमान जयंती निमित्ताने माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी आपल्या सहकाऱ्यांसह शहरातील श्री साई मंदिर,बाभळगाव येथील हनुमान मंदीरात जावून दर्शन घेतले मनोभावे पूजा केली तसेच बाभळगाव येथील हनुमान जयंती निमित्ताने काल्याच्या कीर्तनासाठी उपस्तिती लावली

# 'मिशन लक्ष्यवेध' अंतर्गत लातूरला निवासी क्रीडा निपुणता केंद्र; अॅथलेटिक्स व कुस्ती खेळाडूंची ७ व ८ एप्रिल रोजी नैपुण्य चाचणी

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यातील क्रीडा विकासाला चालना देण्यासाठी आणि जागतिक दर्जाचे खेळाडू घडवण्यासाठी राज्य शासनाने 'मिशन लक्ष्यवेध' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला आहे. या योजनेअंतर्गत लातूर विभागामध्ये अॅथलेटिक्स व कुस्ती या दोन क्रीडा प्रकारांचे 'निवासी विभागीय क्रीडा निपुणता केंद्र' सुरू करण्यात येणार आहे. या केंद्रामध्ये प्रवेश मिळवण्यासाठी अर्ज केलेल्या आणि छाननी अंती पात्र ठरलेल्या खेळाडूंची क्रीडा नैपुण्य चाचणी ७ व ८ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे.

क्रीडा प्रशिक्षण यंत्रणा, आधुनिक पायाभूत सुविधा, क्रीडा वैद्यकशास्त्र आणि खेळाडूंना करिअर मार्गदर्शन अशा विविध घटकांच्या विकासासाठी 'मिशन लक्ष्यवेध' योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. याअंतर्गत लातूर येथे होणाऱ्या चाचणीसाठी अॅथलेटिक्स प्रकारातील पात्र खेळाडूंनी ७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता पोलीस मुख्यालय मैदान, बाभळगाव येथे उपस्थित राहायचे आहे. तसेच कुस्ती या क्रीडा प्रकारासाठी पात्र खेळाडूंची चाचणी जिल्हा क्रीडा संकुल, लातूर येथील कुस्ती हॉलमध्ये ७ एप्रिल रोजी सकाळी १० वाजेपासून सुरू होईल. ही चाचणी प्रक्रिया ७ व ८ एप्रिल असे दोन दिवस चालणार आहे.

सर्व पात्र खेळाडूंना यापूर्वीच सूचनापत्रे पाठविण्यात आली आहेत. तरी अॅथलेटिक्स आणि कुस्ती या दोन्ही प्रकारातील पात्र खेळाडूंनी निश्रि्चत केलेल्या वेळेत आणि स्थळी आपल्या क्रीडा साहित्यासह नैपुण्य चाचणीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन लातूर विभागाचे क्रीडा व युवक सेवा उपसंचालक महादेव कसगावडे यांनी केले आहे.

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवासी वाहतूक, मालवाहतुकीतील वैविध्य आणि तिकीट-व्यतिरिक्त महसूल उपक्रमांमधील सुधारणांच्या जोरावर दमदार वाढ नोंदवली

**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने आर्थिक वर्ष २०२५-२६ दरम्यान कौतुकास्पद कामगिरी नोंदवली आहे. प्रवासी वाहतूक, मालवाहतूक कार्ये आणि तिकीट-व्यतिरिक्त महसूल निर्मिती यांसारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये विभागाने सातत्यपूर्ण वाढ दर्शविली आहे; त्याच वेळी प्रवासी सेवा आणि कार्यक्षमता सुधारण्याचे प्रयत्नही विभागाने अविरतपणे सुरू ठेवले आहेत.

महसुलात दमदार वाढ

विभागाने एकूण ८९४.६१ कोटींचा 'उगम महसूल' (originating revenue) प्राप्त केला, जो मागील वर्षाच्या तुलनेत ६.८५% ची वाढ दर्शवतो. महसूल वाढीच्या दिशेने केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे हे द्योतक आहे.
- प्रवासी महसूल ४०७.९५ कोटींवर पोहोचला, ज्यामध्ये मागील वर्षाच्या तुलनेत ७.८७% ची वाढ नोंदवली गेली.
- मालवाहतूक महसूल ४४८.१८ कोटींवर पोहोचला, जो मागील वर्षाच्या तुलनेत ६.३१% ची वाढ दर्शवतो.
- 'इतर कोचिंग महसूल' (Other Coaching Revenue) आणि 'व्यावसायिक किरकोळ महसूल' (Commercial Sundry Revenue) मध्येही सातत्यपूर्ण वाढ नोंदवली गेली, ज्यामुळे विभागाच्या एकूण कमाईच्या आलेखाला अधिक बळकटी मिळाली आहे.

प्रवासी वाहतुकीत लक्षणीय वाढ

सोलापूर विभागात प्रवाशांच्या हालचालींमध्ये (वाहतुकीत) लक्षणीय वाढ दिसून आली. विभागाने १.९९ कोटींहून अधिक प्रवाशांची वाहतूक हाताळली, जी मागील वर्षाच्या तुलनेत ८.४६% ची वाढ आहे. हे रेल्वे सेवांवरील जनतेचा वाढता विश्वास आणि सुधारलेल्या कनेक्टिव्हिटीचे (जोडणीचे) प्रतिबिंब आहे.

मालवाहतूक आणि वस्तू वाहतुकीची ठळक वैशिष्ट्ये

सोलापूर विभागाने मालवाहतुकीमध्ये वैविध्य आणून आणि कार्यपद्धतीत सुधारणा करून आपल्या मालवाहतूक क्षेत्राला अधिक बळकट करणे सुरूच ठेवले:
- 'वाढीव लोडिंग'च्या (incremental loading) बाबतीत भारतीय रेल्वेमध्ये ५ वा क्रमांक पटकावला, ज्यामुळे विभागाच्या दमदार मालवाहतूक कामगिरीचे महत्त्व अधोरेखित होते.
- IOCL पाकणी येथे POL (पेट्रोलियम, तेल आणि वंगणे) वाहतुकीचे लोडिंग सुरू करण्यात आले; यातून ३९३ रेक्सद्वारे (मालगाड्यांद्वारे) ६२.४ कोटींचा महसूल प्राप्त झाला.
- 'मळी'च्या (Molasses) लोडिंगमध्ये आतापर्यंतची सर्वोच्च कामगिरी नोंदवली गेली.



१७ रेक्सद्वारे मळीची वाहतूक करण्यात आली आणि त्यातून ९.६ कोटींचा महसूल मिळाला, जी मागील वर्षाच्या तुलनेत लक्षणीय वाढ दर्शवते.
- आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये साखरेच्या एकूण ११६ रेक्सचे लोडिंग करण्यात आले. यासोबतच, साखरेच्या लोडिंगचा विस्तार दक्षिण भारतातील नवीन गंतव्यस्थानांपर्यंत करण्यात आला; यामध्ये इरोड जंक्शन, कुडल नगर, तिरुचिरापल्ली आणि नेल्लिकुप्पम या ठिकाणी १५ रेक्सद्वारे साखरेची वाहतूक करण्यात आली.
- भिगवन येथे ६ रेक्सद्वारे स्टील बिलेटची आवक सुरू केली, त्यामुळे उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण झाले.
- बॅगबंद सिमेंट भरण्याऐवजी मोठ्या प्रमाणात सिमेंट भरण्यास सुरुवात केल्यामुळे कार्यक्षमता आणि लॉजिस्टिक्समध्ये सुधारणा झाली.

अमृत भारत स्थानक कामे

-BSS (अमृत भारत स्थानक योजना) अंतर्गत सोलापूर विभागात एकूण १२ स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे; ती म्हणजे सोलापूर, कलबुरागी, लातूर, कुर्डुवाडी, जेऊर, धाराशिव, पंढरपूर, दुधनी, गाणगापुर रोड, शहाबाद, वाडी आणि अक्कलकोट रोड. या कामांसाठी मंजूर झालेला एकूण खर्च अंदाजे ३३० कोटी इतका आहे. तसेच, या १२ स्थानकांसाठी -BSS चा दुसरा टप्पा (Phase-2) देखील मुख्यालयाकडून मंजूर करण्यात आला आहे.

नवीन सुविधा

मंजूर सुविधांची कामे - सोलापूर विभाग (आर्थिक वर्ष २०२५-२६)
- स्थानकांवर लिफ्टची तरतूद: एकूण २९ लिफ्ट्स. खालील स्थानकांवर प्रवासी लिफ्टची तरतूद करण्यात आली आहे: सोलापूर (२), दुधनी (२), गाणगापुर रोड (२), कलबुरगी (४), शहाबाद (२), वाडी (४), जेऊर (३), कुर्डुवाडी (२), पंढरपूर (४), धाराशिव (२) आणि लातूर (२).
- भिगवण, होटगी, मालथन, बोरोटी, कुलाली, हरंगुळ, जिंती रोड, केत्तूर, मोहोळ, मुरुड, कळंब रोड आणि शेंद्री या स्थानकांवर 'हाय लेव्हल प्लॅटफॉर्म'ची (उन्नत फलाटांची) तरतूद.
- हरंगुळ, बोरीबेल, मालथन, मुंढेवाडी, पाकणी आणि बाळे या स्थानकांवर 'फूट ओव्हर ब्रिज'ची (ऋजइ - ३.० मीटर रुंद) तरतूद.

आषाढी एकादशी मेळ्यादरम्यान गर्दीचे विक्रमी व्यवस्थापन

सोलापूर विभागाने आषाढी एकादशी मेळा २०२५ दरम्यान प्रवाशांच्या प्रचंड हालचालींचे यशस्वीपणे व्यवस्थापन केले.
- ६ जुलै २०२५ या मुख्य दिवशी ४२,४०० प्रवाशांचे हाताळणी (वाहतूक व्यवस्थापन) करण्यात आली.
- या कालावधीत प्रवाशांच्या संख्येत (footfall) २३.२४% आणि उत्पन्नात २५.४०% वाढ साध्य करण्यात आली.
- शून्य दुखापत (Zero Injury) आणि शून्य जीवितहानी (Zero Casualty) यासह सुरक्षा मानकांचे अनुकरणीय पालन करण्यात आले, ज्यातून प्रभावी नियोजन आणि समन्वय दिसून आला.

भाडे-व्यतिरिक्त महसुलात (NFR) वाढ

-सोलापूर विभागाने भाडे-व्यतिरिक्त महसुलात (Non-Fare Revenue) लक्षणीय वाढ नोंदवली आहे:
- २.६६ कोटींचा महसूल मिळवला, जो गेल्या वर्षाच्या तुलनेत ३१.६९% वाढ दर्शवतो.
- व्यावसायिक प्रसिद्धी महसुलात (Commercial Publicity Revenue) उत्कृष्ट कामगिरी.
- किराणा दुकाने (kiosks), RDN (रेल डिस्प्ले नेटवर्क), पार्किंग, जजक (बाहेरील जाहिरात फलक) आणि उपहारगृहे (canteens) यांसारखी नवीन कंत्राटे देण्यात आली; यातून वार्षिक ९१.९५ लाखांचा महसूल निर्माण होत आहे.

प्रवासी सुविधा आणि नावीन्य

सोलापूर विभागाने प्रवासी-केंद्रित आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांची सुरुवात केली आहे:
- सोलापूर, कलबुरगी, कुर्डुवाडी आणि जेऊर यांसारख्या प्रमुख स्थानकांवर 'डिजिटल क्सेस मॅप बोर्ड' बसवण्यात आले आहेत.
- सोलापूर येथे 'रेल कोच रेस्टॉरंट' सुरू करण्यात आले, ज्यामुळे प्रवाशांचा अनुभव अधिक समृद्ध झाला आहे.
- तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांसाठी 'बायोमेट्रिक साइन-ऑन/ऑफ' प्रणाली सुरू करण्यात आली-मध्य रेल्वेमध्ये असा उपक्रम राबवणारा हा पहिलाच विभाग ठरला आहे.
- प्रवाशांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी सोलापूर-मुंबई 'वंदे भारत' गाडीमध्ये अतिरिक्त डबे जोडण्यात आले आहेत.
- सोलापूर आणि कलबुरगी स्थानकांवर दृष्टीहीन प्रवाशांसाठी प्रवासाची सुलभता वाढवण्याच्या उद्देशाने 'ब्रेल लिपीतील फलक' (Braille signage) बसवण्यात आले आहेत.

कार्यसंचालनातील उत्कृष्टता आणि सामाजिक जबाबदारी

- आणीबाणीच्या प्रसंगी प्रवाशांना अखंडित मदत पुरवली गेली; यामध्ये पुराच्या काळात अडकलेल्या प्रवाशांसाठी बसची व्यवस्था करण्यासारख्या उपाययोजनांचा समावेश आहे.
- 'क्षयरोग-मुक्त भारत अभियाना'अंतर्गत वैद्यकीय शिबिरे आयोजित करण्यात आली, ज्याचा लाभ रेल्वे कर्मचारी आणि मजुरांना झाला.
- मालवाहतुकीच्या क्षेत्रात नाविन्यपूर्ण उपक्रमांना चालना देण्यात आली; यामध्ये पंढरपूर येथून रामनगरम (कर्नाटक) येथे रेशीम कोष (silk cocoons) पाठवण्याच्या वाहतुकीचा समावेश आहे.

आर्थिक सुज्ञता

थकबाकी वसुलीद्वारे सोलापूर विभागाने भक्कम आर्थिक शिस्तही दर्शवली आहे:
* 'साइडिंग शुल्का'पोटी (siding charges) ९.२३ कोटींची वसुली करण्यात आली; यामध्ये मालवाहतूक करणाऱ्या प्रमुख ग्राहकांकडून करण्यात आलेल्या मोठ्या वसुलीचा समावेश आहे.

आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील सोलापूर विभागाची एकूण कामगिरी ही महसूल वाढ, प्रवासी सेवा सुधारणा, मालवाहतुकीतील वैविध्य आणि नावीन्य यांचा समतोल दृष्टिकोन दर्शवते; तसेच कार्यसंचालनातील कार्यक्षमता आणि ग्राहक-केंद्रित उपक्रमांवर विभागाचे निरंतर लक्ष असल्याचेही यातून दिसून येते.

# सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षकांसाठी नामतालिका तयार करण्याची प्रक्रिया सुरु; ६ एप्रिलपासून अ ॉनलाईन अर्जांचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१(१) (ब) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ६९ (१) (फ) मधील तरतुदीनुसार, सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणासाठी सन २०२६-२०२८ या कालावधीची राज्यस्तरीय लेखापरिक्षकांची नवीन नामतालिका तयार करण्यात येणार आहे. या प्रक्रियेसाठी इच्छुक उमेदवारांकडून ६ एप्रिल ते २० एप्रिल २०२६ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

पात्र लेखापरिक्षकांनी https://mahasahakar.maharashtra.gov.in/en/ या संकेतस्थळावर जाऊन विहित मुदतीत आपले अर्ज सादर करावेत. ऑनलाईन अर्जासंदर्भातील सविस्तर परिपत्रकीय सूचना सहकार विभाग, सहकार आयुक्त व निबंधक यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच, या सूचनांची प्रत सर्व जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरिक्षक आणि विभागीय सहनिबंधक यांच्या कार्यालयामध्येही इच्छुकांच्या माहितीसाठी उपलब्ध आहे. तरी संबंधित व्यावसायिक आणि संस्थांनी या संधीचा लाभ घेऊन वेळेत अर्ज सादर करावेत, असे आवाहन लातूरचे जिल्हा उपनिबंधक व्ही. एल. पोतंगले यांनी केले आहे.

# विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग ०३ एप्रिल रोजी बंद राहणार

**लातूर/प्रतिनिधी :** गुड फ्रायडेनिमित्त शुक्रवार, ३ एप्रिल, २०२६ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आल्याने विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग शुक्रवार, ०३ एप्रिल, २०२६ रोजी बंद राहील. तसेच शनिवार, ४ एप्रिल, २०२६ पासून बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गरुड यांनी कळविले आहे. तसेच रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास सुरु राहील.

# भारतीय टपाल विभागाची फ्रँचायझी २.० योजना सुरु; रोजगारासह टपाल सेवा विस्ताराची मोठी संधी

**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय टपाल विभागामार्फत नागरिकांना अधिक वेगवान, सुलभ आणि त्यांच्या निवासस्थानाच्या जवळ टपाल सेवा उपलब्ध करून देण्यासाठी फ्रँचायझी २.० ही महत्त्वाकांक्षी योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून स्थानिक उद्योजक, दुकानदार आणि इच्छुक व्यक्तींना विभागाचे अधिकृत फ्रँचायझी भागीदार म्हणून काम करण्याची संधी मिळणार असून, टपाल सेवा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. फ्रँचायझी धारकांना स्पीड पोस्ट, नोंदणीकृत टपाल, पार्सल बुकिंग आणि टपाल वितरण यांसारख्या सेवा पुरविता येतील. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जलद व कार्यक्षम सेवा देण्यासोबतच, या योजनेमुळे स्थानिक युवकांसाठी स्वयंरोजगाराच्या नवीन संधी निर्माण होणार आहेत. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये टपाल सेवेचा विस्तार करणे आणि विभागाच्या देखरेखीखाली एक विश्र्वसनीय यंत्रणा उभी करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

ज्या इच्छुक नागरिकांकडे आवश्यक जागा, मूलभूत सोयी-सुविधा आणि निर्धारित पात्रता आहे, ते या योजनेसाठी अर्ज करू शकतात. फ्रँचायझी २.० योजना ही टपाल सेवांचा विस्तार, डिजिटल सक्षमीकरण आणि रोजगारनिर्मिती यांचा एक प्रभावी संगम आहे. या योजनेमुळे टपाल सेवा अधिक लोकाभिमुख आणि परिणामकारक होणार असून, जास्तीत जास्त इच्छुकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन लातूर विभागाचे डाकघर अधीक्षक आर. एस. बोटलावार यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी आपल्या जवळच्या मुख्य टपाल कार्यालयाशी किंवा विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा.

# जागतिक ऑटिझम दिनानिमित्त लातूर जिल्हा परिषदेत जनजागृती

**लातूर/प्रतिनिधी :** अॅजागतिक ऑटिझम दिनाचे औचित्य साधून लातूर जिल्हा परिषदेत जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या वतीने गुरुवारी विशेष जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. स्वमग्नता (ऑटिझम) या विषयावर समाजात व्यापक जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या उपकेंद्रातील समाजकार्य विभागाच्या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. यावेळी विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषदेतील अधिकारी, कर्मचारी आणि उपस्थित नागरिकांना शांती व स्वीकृतीचे प्रतीक असलेली 'निळी रिबीन' बांधून या दिनाचे महत्त्व विषद केले. तसेच ऑटिझम या आजाराबद्दलची सविस्तर माहिती देणाऱ्या माहितीपत्रकांचे वाटप करण्यात आले. या जनजागृती मोहिमेत ऑटिझम म्हणजे काय, त्याची मुख्य लक्षणे, सामाजिक व संवादातील अडचणी, पुनरावृत्ती वर्तन, आजाराची कारणे, लवकर ओळख, अचूक निदान आणि उपचार व व्यवस्थापन या विविध तांत्रिक आणि सामाजिक पैलूंवर मार्गदर्शन करण्यात आले. यंदाच्या जागतिक ऑटिझम दिनाची मुख्य थीम ऑटिझम आणि मानवता - प्रत्येक जीवनाला मूल्य आहे अशी आहे. ही संकल्पना स्वमग्न व्यक्तींचा सन्मान, त्यांचे हक्क, सामाजिक समावेश आणि त्यांना मिळणाऱ्या समान संधींच्या महत्त्वावर भर देते. त्यांच्यातील अद्वितीय क्षमतांना वाव देणे आणि त्यांना समाजाचा अविभाज्य घटक मानणे, हा या थीमचा मुख्य उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले. मानवता, मूल्य, सर्वसमावेशकता आणि जागरूकता या चतुःसूत्रीवर आधारित हे मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे बस्वराज पैके यांच्यासह समाजकार्य विभागातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विशेष परिश्रम घेतले.

# युवक काँग्रेसच्या प्रदेश संघटन सरचिटणीसपदी प्रविणकुमार बिरादार यांची नियुक्ती

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या नव्या प्रदेश कार्यकारिणीत प्रविणकुमार बिरादार यांची प्रदेश संघटन सरचिटणीस म्हणून महत्त्वपूर्ण नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांनी ही कार्यकारिणी जाहीर केली असून, भारतीय युवक काँग्रेसचे राष्ट्रीय प्रभारी मनिष शर्मा, राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानू चिब, राष्ट्रीय महासचिव व महाराष्ट्र प्रभारी अजय छिकारा, राष्ट्रीय सचिव व सहप्रभारी नवज्योतसिंग सिंधू आणि राष्ट्रीय सहसचिव शांभवी शुक्ला यांच्या मान्यतेने ही घोषणा करण्यात आली आहे. १२६ जणांच्या या कार्यकारिणीत संघटन सरचिटणीसपदी निवड झालेल्या प्रविणकुमार बिरादार यांनी संघटनेत तळागाळातून काम करत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. युवकांमध्ये मजबूत संघटन उभारणे, कार्यकर्त्यांना एकत्रित ठेवणे आणि सातत्याने पक्षाच्या विचारासाठी झटणे ही त्यांची खास वैशिष्ट्ये मानली जातात. विशेष म्हणजे, कोणतीही मोठी राजकीय पार्श्र्वभूमी नसतानाही केवळ मेहनत, निष्ठा आणि संघटन कौशल्याच्या जोरावर त्यांनी हे पद मिळवले आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे युवक काँग्रेसच्या संघटनात्मक बळकटीला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. तळागाळातील कार्यकर्त्यांना संधी देण्याच्या भूमिकेचा हा एक आदर्श नमुना मानला जात असून, प्रविणकुमार बिरादार यांच्या नेतृत्वाखाली युवक काँग्रेसमध्ये नवचैतन्य निर्माण होईल, असा विश्र्वास कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे. राज्यभरातून नेते आणि कार्यकर्त्यांकडून त्यांच्या नियुक्तीचे स्वागत आणि कौतुक होत आहे.

## मान्सूनपूर्व नाले सफाई व अतिक्रमणासंदर्भात बैठक

**लातूर/ प्रतिनिधी:** मान्सून पूर्व नालेसफाई आणि शहराच्या चारही बाजूंनी जाणाऱ्या रिंग रोडवरील अतिक्रमणे या संदर्भात महापौर जयश्री सोनकांबळे व मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली.

उपमहापौर स्नेहल उटगे, अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव,उपायुक्त वसुधा फड,वंचित बहुजन आघाडीचे गटनेते अमोल लांडगे यांचीही या बैठकीस उपस्थिती होती.

आगामी पावसाळ्याच्या दृष्टिकोनातून मान्सूनपूर्व नाले सफाईचा आराखडा तयार करावा अशा सूचना या बैठकीत संबंधित विभागांना देण्यात आल्या. प्रत्येक प्रभागात हमला पद्धतीने नालेसफाई करावी. यासाठी महानगरपालिकेत आपत्कालीन कक्षाची स्थापना करावी. शहरातील नागरिकांच्या घरात पाणी शिरणार नाही, याची दक्षता घ्यावी. धोकादायक झाडे व फांद्या तोडाव्यात.मोडकळीस आलेल्या धोकादायक इमारतींच्या ठिकाणी सूचना फलक लावावेत.रस्ते दुभाजकातील कचरा उचलून ते स्वच्छ करावेत, अशा सूचना यावेळी करण्यात आल्या. स्वच्छता विभाग व बांधकाम विभागाने मान्सूनपूर्व नाले सफाईची कामे त्वरित सुरू करण्याचे आदेश यावेळी देण्यात आले.

शहराच्या बाहेरून जाणाऱ्या रिंग रोडवर अतिक्रमणे होत असल्याच्या तक्रारी येत आहेत. त्या अनुषंगाने अतिक्रमणे झाली आहेत की नाही? याचे सर्वेक्षण करून ८ दिवसात अहवाल सादर करण्याचे आदेशही या बैठकीत देण्यात आले.

यावेळी मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, क्षेत्रीय अधिकारी रवी कांबळे, संतोष लाडलापुरे, समाधान सूर्यवंशी, विजय राजुरे, मुख्य स्वच्छता निरीक्षक रवी कांबळे, धोंडीबा सोनवणे, शिवराज शिंदे,अक्रम शेख यांच्यासह सर्व १८ प्रभागांचे स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते.

## मतदार यादी विशेष सघन पुनरीक्षण कार्यक्रम; तपशील अद्ययावत न केल्यास नाव वगळले जाण्याची शक्यता

**लातूर /प्रतिनिधी:** भारत निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या सूचनेनुसार, लातूर जिल्ह्यात 'विशेष सघन पुनरावलोकन' (SIR) कार्यक्रम प्रभावीपणे राबविला जात आहे. या मोहिमेतंर्गत मतदार यादीतील अस्पष्ट (ब्लअर) फोटो, डी.एस.ई., एस.आय.आर. मॅपिंग आणि नावातील दुरुस्ती ही कामे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्यामार्फत केली जात आहेत. ३१ मार्च २०२६ ही मुदत संपल्यानंतरही हे काम सध्या सुरू असून, मतदारांनी प्रशासनाला सहकार्य करणे आवश्यक असल्याचे आवाहन करण्यात आले आहे.

आतापर्यंत लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे मॅपिंगचे केवळ ५७ टक्के कामकाज पूर्ण झाले आहे. ज्या मतदारांचे मॅपिंग अद्याप झालेले नाही, त्यांना बीएलओमार्फत सुनावणीसाठी बोलावले जाईल. अशा सुनावणीस दोन ते तीन वेळा अनुपस्थित राहिल्यास किंवा आवश्यक पुरावे सादर न केल्यास संबंधित मतदाराचे नाव मतदार यादीतून थेट वगळले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे २३४-लातूर ग्रामीण आणि २३५-लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदारांनी आपल्या भागातील बीएलओंची प्रत्यक्ष भेट घेऊन आपली माहिती अद्ययावत करून घ्यावी.

या प्रक्रियेसाठी मतदारांनी सन २००२ च्या मतदार यादीतील स्वतःचे आई, वडील, आजी किंवा आजोबा यांचा तपशील https://voters.eci.gov.in/searchInSIR/SZU-4DPDF-JKSQWODSE या अधिकृत लिंकवर किंवा 'ECINET' या पवर शोधून बीएलओ यांना उपलब्ध करून द्यावा. विवाहित महिलांनीदेखील त्यांच्या माहेरच्या (२००२ मधील) नातेवाईकांची माहिती देऊन प्रशासनास सहकार्य करावे. ही मोहीम मतदार यादी अधिक शुद्ध आणि त्रुटीरहित करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची असून, नागरिकांनी आपले नाव मतदार यादीत कायम राखण्यासाठी तत्परतेने माहिती द्यावी, असे आवाहन उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे आणि तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

## लाचखोरांचा 'गेम ओव्हर'! पाच हजारांची लाच स्वीकारणाऱ्या सहनिबंधक, लिपिकाला कारावास

लातूर /प्रतिनिधी: मत्स्य व्यवसायाचा प्रस्ताव मंजूर करण्यासाठी पाच हजार रुपयांची लाच स्वीकारल्याप्रकरणी, लातूर येथील सहनिबंधक आणि कनिष्ठ लिपिकाला विशेष न्यायालयाने दोषी ठरवून कारावासाची शिक्षा लातूर अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालय क्र. १ चे न्यायाधीश आर.आर. भोसले यांनी मंगळवारी सुनावली.

एसीबीच्या सूत्रांनी सांगितले, या लाच प्रकरणातील फिर्यादीने आपला मत्स्य व्यवसायाचा प्रस्ताव मंजुरीसाठी जिल्हा दुग्ध विकास कार्यालयात सादर केला होता. दरम्यान, हा प्रस्ताव मंजूर करण्याच्या बदल्यांमध्ये सहकारी संस्था-दुग्ध, सहनिबंधक बालाजी विठ्ठलराव काळे (वय ३५) यांनी पाच हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. ही रक्कम बालाजी काळे यांच्या सांगण्यावरून कनिष्ठ लिपिक सुरेश राघोबा माळी (वय ५७) यांनी स्वीकारली होती. याबाबत शिवाजीनगर पोलिस ठाण्यात २०१२ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. लातूर येथील अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालय क्र. १ चे न्यायाधीश आर. आर. भोसले यांनी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून आरोपी बालाजी काळे याला भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७ अन्वये २ वर्ष ६ महिने साधा कारावास आणि १५ हजार रुपयांचा दंड, तसेच कलम १३ (२) अन्वये ३ वर्षे साधा कारावास आणि १० हजारांचा दंड अशी शिक्षा सुनावली तर आरोपी सुरेश माळी याला भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम १२ अन्वये २ वर्षे साधा कारावास आणि ७ हजार ५०० रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली. गुन्ह्याचा तपास लातूर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे तत्कालीन पोलिस निरीक्षक जे. आर. भंडारवार यांनी केला. सरकार पक्षाच्या वतीने सहायक शासकीय अभियोक्ता रमाकांत पी. चव्हाण पाखरसांगवीकर यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस निरीक्षक जगदीश राऊत यांनी पैरवी अधिकारी म्हणून काम पाहिले तर कोर्ट अंमलदार भागवत कठारे यांनी न्यायालयीन कामकाजात सहकार्य केले.

# 'माझं गाव,आरोग्य संपन्न गाव' अभियानाला धाराशिवात उत्स्फूर्त प्रतिसाद

### विशेष ग्रामसभांमधून आरोग्यदायी भविष्याचा संकल्प

**धाराशिव (जिमाका)-** राज्य शासनाच्या माझं गाव, आरोग्य संपन्न गाव या महत्त्वाकांक्षी अभियानांतर्गत आज जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्रामसभांचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले.या ग्रामसभांमध्ये गावाच्या सर्वांगीण आरोग्यवृद्धीसाठी विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.




या अभियानाचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील नागरिकांचे आरोग्य सुधारणे,प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबविणे आणि स्वच्छतेबाबत व्यापक जनजागृती करणे हा आहे.ग्रामसभांमध्ये गावातील आरोग्य स्थितीचा आढावा घेत कुपोषण,माता व बाल आरोग्य, संसर्गजन्य आजारांचे नियंत्रण, स्वच्छ पाणीपुरवठा,कचरा व सांडपाणी व्यवस्थापन तसेच स्वच्छता या मुद्द्यांवर विशेष भर देण्यात आला.

उपचारांपेक्षा प्रतिबंध महत्त्वाचा या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवून या अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.यामध्ये संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण कमी करणे, माता-बाल आरोग्य सुधारणा,पोषण, सुरक्षित पाणी,स्वच्छता, जीवनशैलीजन्य आजारांचे नियंत्रण तसेच मानसिक आरोग्य यांचा समावेश आहे.नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यावर शासनाचा विशेष भर आहे.

ग्रामसभांमध्ये आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका,ग्रामसेवक, आरोग्य विभागाचे अधिकारी -कर्मचारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रत्येक गावासाठी आरोग्य कृती आराखडा (Health Action Plan) तयार करण्यावर भर देण्यात आला असून,प्रत्येक कुटुंबाचा आरोग्य तपशील नोंदवून नियमित तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

स्वच्छ गाव,निरोगी गाव या संकल्पनेला बळकटी देण्यासाठी ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवला. नियमित व्यायाम,संतुलित आहार, लसीकरण आणि वैयक्तिक स्वच्छता याबाबत जनजागृती करण्यात आली.तसेच तंबाखू व मद्यपानाच्या व्यसनमुक्तीसाठी विशेष मोहिमा राबविण्याचे आवाहन करण्यात आले.

आरोग्य विभाग,जिल्हा परिषद धाराशिव यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य,ग्रामविकास व महिला व बालविकास विभागाच्या समन्वयाने हे अभियान प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.प्रत्येक गाव आरोग्य संपन्न गाव बनविण्याचा निर्धार ग्रामपंचायतींच्या सरपंच,सदस्य व पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. जिल्ह्यातील ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता हे अभियान निश्चितच यशस्वी होईल,असा विश्वास जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी व्यक्त केला आहे.

## प्रतिबंधित गुटखा तस्करीवर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; ७.९३ लाखांचा मुद्देमाल जप्त, तीन आरोपीवर गुन्हा दाखल

**लातूर /प्रतिनिधी:** लातूर जिल्ह्यात अवैध धंद्यांवर प्रभावी आळा घालणे, नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित गुन्ह्यांवर कठोर नियंत्रण ठेवणे तसेच महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध साठा, विक्री व वाहतुकीस पूर्णतः प्रतिबंध घालण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या नियंत्रणाखाली स्थानिक गुन्हे शाखेमार्फत विशेष मोहीम सातत्याने राबविण्यात येत आहे.

या मोहिमेअंतर्गत वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर (स्थानिक गुन्हे शाखा, लातूर) यांच्या नेतृत्वात दिनांक ०२/०४/२०२६ रोजी उशिरा रात्री स्थानिक गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने नियोजनबद्ध सापळा रचून प्रतिबंधित गुटखा तस्करी करणाऱ्यावर कारवाई केली आहे.

सदर पथकाने दिनांक ०२/०४/२०२६ रोजी मध्यरात्री ००.१५ वाजता पोलीस स्टेशन चाकूर हद्दीतील मोजे नळेगाव येथे जिल्हा परिषद शाळा पाठीमागे एक पांढऱ्या रंगाची Hyundai Accent कार मधून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा विक्रीसाठी आणण्यात येत असलेल्या वाहनास ताब्यात घेत असताना पोलिसांची चाहूल लागताच एक इसम अंधाराचा फायदा घेऊन घटनास्थळावरून पसार झाला. मात्र, गाडीत असलेल्या दोन इसमांना ताब्यात घेण्यात आले. ताब्यात घेतलेल्या इसमांनी आपली नावे १) सचिन (वय २९ वर्षे) २) अनिल (वय ३० वर्षे) दोघेही रा. नळेगाव, ता. चाकूर, जि. लातूर तसेच पळून गेलेल्या इसमाचे नाव ३) शुभम (वय ३० वर्षे, रा. नळेगाव) असल्याचे त्यांनी सांगितले. वाहनाची सखोल झडती घेतली असता गाडीच्या मागील सीटवर व डिग्गीत पांढऱ्या पोत्यांमध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ विमल पान मसाला, तंबाखू तसेच सदर अवैध वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली Hyundai Accent कार असा एकूण ७,९३,६००/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी आरोपी सचिन विठ्ठलराव वडजे, अनिल नरहरी टोम्पे, शुभम मुकुंद शेलार (फरार) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १२३, २७४, २७५, २२३, ३(५) तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियम कलम ५९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष पथके कार्यरत आहेत.

## भारतीय दलित पँथर साजरा करणार समतेच्या संस्कारांचा पंधरवडा

### कर्मयोध्दा अंबादास शिंदे

**लातूर /प्रतिनिधी:** भारतीय घटनेच्या माध्यमातून समानतेवर उभा राहिलेला लोकशाहीवादी भारतीय समाज,पुन्हा एकदा विषमतेच्या विषाने गुदमरून टाकण्याचा निष्फळ प्रयत्न आर.एस.एस,प्रणित विविध पक्ष संघटना मोठ्या ताकतीने करीत आहेत.त्यांचे वांझोटे प्रयत्न मोडीत काढण्यासाठी भारतीय दलित पँथर समतेचा संस्काराचा पंधरवाडा कार्यक्रम राबविणार असून,त्याची सुरुवात दिनांक ०६एप्रिल २०२६ रोजी स्मृतीशेष प्रा.नागनाथ गुंडाप्पा स्वामी यांची जयंती साजरी करून करण्यात येणार आहे,११ एप्रिल २०२६ महात्मा ज्योतिराव फुले , १४ एप्रिल विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर , १९ एप्रिल महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करून ह्या समतेच्या पंधरवड्याची समाप्ती केली जाईल, असे भारतीय दलित पँथरचे संस्थापक अध्यक्ष कर्मयोद्धा अंबादास सैदू शिंदे यांनी सांगितले. त्यांनी सांगितले की,गेल्या दीड दशकापासून आर.एस.एस ,प्रणित विविध पक्ष संघटनांच्या माध्यमातून,समाजात असमानतेच्या संस्कारांची विषारी पेरणी विश्वासघाताने छुप्या पद्धतीने बहुजन समाजात केली जात आहे. आणि त्याचाच परिपाक म्हणून समाजात सर्व स्तरात अराजकता, गुन्हेगारी, अशांतता,बेरोजगारी, आणि आणिती,अमानुषता बोकाळल्याचे चित्र आहे.

या आर.एस.एस.चे विषमतावादी कार्यकर्ते अंधभक्त,बर्याच दिवसांपासून विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीत सामील होऊन,विविध समाजसेवेचे कार्य करत असल्याचे भासवून बहुजन समाजाला,आंबेडकरी समाजाला भ्रमित करण्याचे कार्य हे लोक मोठ्या सीताफीने करत आहेत. आणि येणकेन प्रकारे मनूला अभिप्रेत असलेली विषमता,अज्ञान,भय,आणि दैववाद,ते पुन्हा या समाजात पेरून मनुवाद-ब्राह्मण धर्म या भारतीय समाजात बळकट करण्याचे दिवा स्वप्न ते पाहत आहेत. आणि त्यासाठी बहुजन समाजातीलच काही अल्पज्ञानी,मतलबी,आत्मसन्मान नसलेल्या लोकांचा वापर करत आहेत. समतेवर आधारित समाज निर्मिती करण्यासाठी जो संघर्ष वरील समतानायकांनी, समता प्रस्थापित करण्यासाठी केला.त्या संघर्षाचे, त्यांनी घेतलेल्या परिश्रमाचे,आणि त्यांच्या कार्याची जागृती करण्यासाठी म्हणून,वरील महापुरुषांच्या जयंती साजरी करून केला जाणार हा समतेचा पंधरवाडा विविध समाजोपयोगी दिशादर्शक कार्यक्रमाने ओतप्रोत भरलेला असेल.

हा समतेच्या संस्काराचा पंधरवाडा साजरा करत असताना,अनेक समतावादी,समता,लोकशाही,आणि मानवतावादी मूल्यांवर विश्वास असणार्या,पक्ष-संघटनांना सोबत घेऊन, हा समतेच्या संस्काराचा पंधरवाडा संपूर्ण महाराष्ट्रभर साजरा केला जाईल,असेही भारतीय दलित पँथरचे संस्थापक अध्यक्ष कर्मयोद्धा अंबादास सैदू शिंदे यांनी सांगितले.त्याचाच एक भाग म्हणून पूर्ण लातूर जिल्हाभर हा पंधरवाडा मोठ्या दिमाखात फक्त नाचूनच नाही तर विविध समाज उपयोगी कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरा केला जाईल,त्यासाठीच्या नियोजन समितीचे अध्यक्ष रणजित आचार्य व ज्येष्ठ पँथर प्रा.शिवशरण हावळे ,भारतीय दलित पँथरचे लातूर जिल्हाध्यक्ष एस.बी.मांदळे हे प्रयत्नशील आहेत असेही त्यांनी सांगितले.

## नद्यांच्या प्रदूषण नियंत्रणावर लक्ष ठेवण्यासाठी ऑनलाईन यंत्रणा उभारा -मंत्री पंकजा मुंडे

**मुंबई /प्रतिनिधी:** नद्यांमधील प्रदूषण नियंत्रणासाठी सतत तपासणीसाठी ऑनलाईन यंत्रणा उभारण्याबाबत पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी बैठक घेतली. 'नमामी गंगा' उपक्रमातील पद्धतीचा अभ्यास करून अहवाल सादर करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

पर्यावरण मंत्री मुंडे म्हणाल्या की, राज्यातील नद्यांतींल प्रदूषण नियंत्रणासाठी तपासणी यंत्रणा ऑनलाईन व्हावी, यासाठी यंत्रणा उभारण्यात यावे. नमामी गंगे अभियानात ज्या प्रकारे यंत्रणा उभारण्यात आली त्याचा अभ्यास करून तशी यंत्रणा महाराष्ट्रात उभारण्यात यावी. तसेच यासंदर्भात एक ॲप तयार करण्यात यावे.

यावेळी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, सहसंचालक (जल) जगन्नाथ साळुंखे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव राहुल रेखावार हे दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

## यशवंत नागरी सह. बँकेची उल्लेखनीय आर्थिक कामगिरी; ठेवी १२२ कोटींवर, १.३१ कोटी नफा

**लातूर/प्रतिनिधी** : यशवंत नागरी सहकारी बँक लि., लातूरने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये उत्कृष्ट कामगिरी नोंदवत १.३१ कोटी रुपयांचा निव्वळ नफा प्राप्त केला आहे. बँकेने नेट एनपीए शून्य टक्के राखण्यात यश मिळवले असून, एकूण व्यवसाय १९७.२९ कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे.

बँकेचे भागभांडवल ४.०७ कोटी रुपये असून, एकूण ठेवी १२२ कोटी २७ लाख आणि कर्जवाटप ७५ कोटी २ लाख इतके झाले आहे. सध्या बँकेचे कार्यक्षेत्र लातूर, बीड, धाराशिव आणि नांदेड जिल्हा आहे. उषाकिरण कॉम्प्लेक्स, बार्शी रोड लातूर येथे मुख्य कार्यालय असून बार्शी रोड, कव्हा रोड, औसा, किल्लारी आणि धाराशिव येथे एकूण पाच शाखा कार्यरत आहेत. याशिवाय छत्रपती संभाजीनगर, सोलापूर आणि पुणे या जिल्ह्यांमध्ये कार्यक्षेत्र विस्तारासाठी परवानगी प्राप्त झाली आहे. विशेष म्हणजे या आर्थिक वर्षात बँकेने औसा रोड, लातूर येथे 'यशवंत भवन' ही स्वमालकीची सुसज्ज व प्रशस्त इमारत खरेदी करून पायाभूत सुविधांमध्ये महत्त्वपूर्ण भर घातली आहे. ग्राहकांना अधिक सुलभ व आधुनिक सेवा देण्यासाठी बँकेने कोर बँकिंग प्रणालीसह अँड्रॉइड व ळजड मोबाईल बँकिंग प, एटीएम, यूपीआय, आरटीजीएस, आयएमपीएस आणि बीबीपीएस या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. सर्व शाखांमध्ये वीज बिल भरणा केंद्र तसेच लॉकर सुविधा उपलब्ध आहेत. आरबीआयच्या नियमानुसार बँकेचा अधिकृत संपर्क क्रमांक १६००११२०२३ असून, पुढील सर्व अधिकृत संदेश याच क्रमांकावरून पाठविण्यात येतील. बँकिंग सेवांसोबतच बँकेने रुग्णवाहिका सेवा, नेत्र व दंत तपासणी शिबिरे, तसेच एकादशी निमित्त फराळ वाटप यांसारखे विविध सामाजिक उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकीही जपली आहे.

## अनधिकृत अग्नीशस्त्र बाळगणाऱ्यावर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; गावठी पिस्टल जप्त

**लातूर /प्रतिनिधी:** लातूर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, गुन्हेगारीवर प्रभावी आळा घालणे तसेच अनधिकृत शस्त्रसाठा पूर्णपणे नष्ट करण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक श्री.अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली व अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांच्या नियंत्रणाखाली स्थानिक गुन्हे शाखेमार्फत सातत्याने विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत दिनांक ०१ एप्रिल २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई करत एक इसमास विनापरवाना गावठी अग्नीशस्त्रासह रंगेहात ताब्यात घेण्यात यश मिळविले आहे.

वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर (स्थानिक गुन्हे शाखा, लातूर) यांच्या नेतृत्वातील पथकाने दिनांक ०१/०४/२०२६ रोजी दुपारी शिरूर अनंतपाळ येथील आरी मोड येथे एक इसम कमरेला गावठी अग्नीशस्त्र बाळगून संशयास्पद हालचाली करणाऱ्या संशयित इसमास ताब्यात घेऊन त्याची चौकशी केली असता त्याने आपले नाव भगवान (वय २६ वर्षे, रा. हालकी, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर) असे सांगितले.

त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या कमरेला पॅन्टमध्ये खोचलेली एक गावठी पिस्टल (अंदाजे किंमत रुपये ४०,०००/-) आढळून आली. सदर पिस्टल जप्त करण्यात आली असून आरोपी भगवान हणमंत सूर्यवंशी याच्याविरुद्ध शस्त्र अधिनियम कलम ३(१)/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास शिरूर अनंतपाळ पोलीस करीत आहेत.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस उपनिरीक्षक राजेश घाडगे, सहायक पोलीस उपनिरीक्षक सर्जेराव जगताप, पोलीस अंमलदार युवराज रामगिर गिरी,प्रदीप स्वामी,सिद्धेश्वर मदने, जमीर शेख,राहुल कांबळे प्रदीप चोपणे यांनी केली आहे.

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६